मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ४७ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००१

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## एक गाव एक गणपती

**बहुतांश योजना मुंबईकडून ग्रामीण भागाकडे येतात. परंतु उस्मानाबाद जिल्ह्यातील ही आदर्श योजना महाराष्ट्राला व देशाला मार्गदर्शक अशी ठरणार आहे.**

कायद्याने किंवा बंधनाने कोठलीही चांगली गोष्ट घडू शकत नाही. पण समाजाला पटवून देऊन, समजावून देऊन विधायक कार्य घडवून आणता येते. समाजमनाची अशी जाण असणारा एक पोलीस अधिकारी डॉ. के. वेंकटेशम यांच्या रूपाने १९९६ साली उस्मानाबाद जिल्ह्याला लाभला. त्यांनी गावेगावी फिरून गणोशोत्सवाचे मूळ स्वरूप व यासाठी जमणाऱ्या निधीतून गावाची विकास-कामे होऊ शकतात, हे पटवून दिले. गावागावातून 'एक गाव एक गणपती'; तर शहरातून 'एक वॉर्ड एक गणपती' अशा पद्धतीने गणेशाची स्थापना केल्यास पोलिसांच्या बंदोबस्तावरील ताणही कमी होईल आणि गावागावातील तंटे-बखेडे कमी होऊन सौहार्दाचे वातावरण टिकून राहील, हा त्यामागील डॉ. वेंकटेशम यांचा हेतू गेल्या **सहा वर्षात उस्मानाबाद जिल्ह्यात तरी मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला आहे, असेच म्हणावे लागेल.**

उस्मानाबाद जिल्ह्यात 'एक गाव एक वॉर्ड, एक गणपती योजना' १९९६ मध्ये ७१४ गावांपैकी केवळ दोन गावांत आणि नगर परिषद हद्दीतील १२९ वॉर्डांपैकी १२ वॉर्डांत स्वीकारण्यात आली. तर २००० पर्यंत जिल्ह्यातील ७१४ गावांपैकी ३४२ गावांत आणि नगर परिषद हद्दीतील १२९ वॉर्डांपैकी ६३ वॉर्डांत ती सफल झाली.

यावर्षी तर उस्मानाबाद जिल्ह्यात हा उपक्रम राबवून प्रथम येणाऱ्या गणेश मंडळास प्रत्येकी दहा हजार रुपयांचे रोख बक्षीस व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलिस प्रमुख प्रभातकुमार यांनी जाहीर केले आहे. पोलिस आणि समाज एकत्र आल्यास उत्कृष्ट सामाजिक कार्य घडू शकते, याचे हे चांगले उदाहरण आहे.

सामाजिक बांधिलकेच्या जाणिवेतून शिस्तबद्ध व विधायकदृष्टी बाळगून गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गावांना निरनिराळ्या प्रकारची बक्षिसे ठेवण्यात आल्यास कार्यकर्त्यांमध्ये निकोप स्पर्धा सुरू होईल. निरनिराळ्या देखाव्यांतून राष्ट्रभक्ती वाढविता येईल. कानठळ्या बसविणाऱ्या वाद्यांऐवजी नादमधुर टाळ मृदुंगाचे स्वर आणता येतील. मिरवणुकीतही मर्यादित वाहने ठेवता येतील. आरोग्यविषयक प्रश्न, तसेच जातीय दंगली निर्माण करणाऱ्या गुलालऐवजी गुलाबाच्या पाकळ्या उधळण्याचीही प्रथा सुरू करता येईल. विविध धर्मीयांच्या रंगाच्या पताका लावून जातीय ऐक्य साधता येईल. हे कार्य लगेचच होईल असे नाही, पण उस्मानाबादसारख्या जिल्ह्यात सुरवात करण्यात आलेल्या या यशस्वी संकल्पनेचा प्रयोग राज्यात सर्वत्र करायला काहीच अडचण नाही.

**- मोतीचंद बेदमुथा**

(महाराष्ट्र टाईम्स १९.०८.२००१ मधून साभार)

### तरुणांसाठी लेखनस्पर्धा - मुदतवाढ

मागील अंकात तरुणांसाठी लेखन स्पर्धा जाहीर केली होती. काही सभासदांनी विनंती केल्यावरून जास्तीत जास्त कुलबांधवांना स्पर्धेत भाग घेता यावा म्हणून साहित्य पाठवण्याची **मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.** - संपादक.

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच ४थ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचे मधे परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते.

कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत जून ९, जुलै १४ आणि ऑगस्ट ११ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. यापैकी ९ जून आणि १४ जुलैच्या सभांना पूर्वविश्वस्त मोहन सदाशिव (पृ.३६५) हे आवर्जून उपस्थित होते. ते आता पुन्हा खार-मुंबई येथे रहायला आले आहेत.

**आश्रयदाते सभासद**

कै. सुरेशभाऊंचे दोन्ही पुत्र यशवंत आणि वसंत प्रत्येकी रु. १,००० वर्गणी भरून मराठे प्रतिष्ठानचे आश्रयदाते सभासद झाले आहेत. प्रतिष्ठानच्या कार्यात त्यांच्या प्रत्यक्ष सहभागाची ही नांदी आहे असे आम्ही समजतो.

**शैक्षणिक मदत**

साखळी गोवा येथील कुलबांधव **सुरेश त्र्यंबक यांची मुलगी मीनाक्षी** (पृ.२१८) हिला कंप्युटर शिक्षण घेण्यासाठी रु. ५,००० शैक्षणिक मदत १४ जुलैच्या सभेत मंजूर करण्यात आली.

**शिक्षण निधी देणग्या**

१. सौ. सुनीता अरविंद, (पृ.१३२) तुस्कॉन, U.S.A — रु. ५०१

२. कु. सुकृत विनायक खांबेटे (पृ.६९४), विलेपार्ले, मुंबई — रु. २५१

**कै. सुरेशभाऊ स्मृति निधी देणग्या**

१. सौ. कुमका वा. ताम्हनकर, पेडणे, गोवा — रु. २००

**हितगुज वितरण**

प्रत्येक अंकासाठी हितगुजचा वितरणखर्च सुमारे साडेतीन हजार रुपये होते. (पोस्टेज रु. २,७००) हा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने सुरवात झाली आहे. डोंबिवली, ठाणे, मुलुंड, बदलापूर, नालासोपारा-आगाशी परिसर, या भागातले अंक कुलबांधवांच्या पुढाकाराने वितरण केले जात आहेत. नालासोपारा येथील **कुलबांधव हेमंत अरुण (पृ.२१) यांचा टेलिफोन क्रमांक ९५२५०-४३३०३८ आहे** याची नोंद घ्यावी. मागील अंकातला बदललेला आहे.

मागील अंकातील आवाहनानुसार बोरिवली मधून राहूल मोरेश्वर खांबेटे (पृ.७०२), विलेपार्ले मधून अंनत गोपाळ चक्रदेव (पृ.७२१), सौ. आरती विनायक खांबेटे (पृ.६९४) व त्यांचा मुलगा अद्वैत तसेच सौ. स्वाती हेमंत (पृ.४७१) आणि भांडुपहून दिनेश मुकुंद (पृ.३६९) यांनी अंक वितरणाबाबत सहकार्याचा हात पुढे केला आहे. पुण्यातहि कुलबांधवांमार्फत अंक वितरणाची व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे.

मुंबईत अंधेरी, गोरेगांव, मालाड, दादर-माहीम भागांतून तसेच कल्याण-अंबरनाथ मधे वितरण करण्यासाठी कुलबांधवांनी आपण होऊन पुढे यावे असे आवाहन आहे. ***

---



## जगन्नाथ दामोदर

**प्रथम पुण्यतिथी : २७.८.२००१**

**दुसऱ्याला होईल ती मदत करीत**
**मित्रपरिवार मोठा - प्रत्येकाचे आदरातिथ्य**
**पण रमायचे मात्र मोजक्या माणसांत**
**मुलांत मात्र सर्वतऱ्हेच्या.**

**त्यांनी कुणाला कधी शत्रू मानलं नाही.**
**त्यांच्याशी शत्रुत्व करणाऱ्यालाही**
**पण मित्र म्हणवणाऱ्यांचं शत्रुत्व,**
**कृतज्ञतेची भाषा करणाऱ्यांची कृतघ्नता**
**असे कटु अनुभव खूप घेतले.**

**मात्र अपरोक्ष सुद्धा अशा माणसांबद्दल**
**द्वेषाची, निंदानालस्तीची भाषा**
**त्यांनी कधी वापरली नाही.**

**वाईटाला वाईटानं उत्तर देणं सोपं असतं**
**त्या वाटेने ते कधीच गेले नाहीत.**
**चांगुलपणा जपण्याची किंमत त्यांनी पुरेपुर**
**मोजली. पण त्याबद्दल कधी चुकूनसुद्धा**
**कुरकूर, तक्रार केली नाही.**

**-श्रीमती जयश्री जगन्नाथ (पृ.३७१) ठाणे**

## कृतज्ञता

*फक्त SSC पर्यंत शिक्षण. तरीहि जगन्नाथ दामोदर यांनी ठाण्यात स्वत:चा मोटर गॅरेजचा व्यवसाय यशस्वीपणे चालवला. त्यांच्या स्मरणार्थ, ऑटोमोबाईल इंजिनियरिंगचे (पदवी, पदविका अथवा आयटीआय) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला दरवर्षी जगन्नाथ दामोदर स्मृति शिष्यवृत्ती देण्यासाठी जयश्रीबाईंनी पतीच्या तृतीय मासिक स्मृतिदिनी (२७.११.२०००) मराठे प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला रु. २०,००० देणगी दिली आहे. (पहा हितगुज डिसेंबर २०००)*

*- कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान*



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**'हमों'चे बालकाण्ड**

**ह. मो. मराठे** (हनुमंत मोरेश्वर, पृ.५३७) हे नांव आज साहित्यक्षेत्रांत आघाडीचे कथा कादंबरीकार, प्रयोगशील संपादक म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांचे अलिकडेच प्रसिद्ध झालेले 'बालकाण्ड' हे ३३२ पानी पुस्तक म्हणजे या लेखकाच्या बालपणाची कुमारदशा प्राप्त होईपर्यंतची दहा-बारा वर्षांची कहाणी आहे. सामाजिकतेचे व्यापक परिमाण लाभलेली ही वैयक्तिक आत्मकहाणी प्रत्येक वाचकाला अंतर्मुख करील. **- नीला उपाध्ये,**

महाराष्ट्र टाईम्स ५.८.२००१

**रंगा मराठे यांचे 'फॅक्टरी गेट'**

रंगा मराठे यांचे (**रंगनाथ यशवंत,** पृ.३८४) बोट धरून आपण या 'फॅक्टरी गेट' मधून 'एम्. अँड डब्ल्यू' मध्ये प्रवेश केला की कारखान्यात झालेले मेननचे आगमन, त्याचे डावपेच, त्यांना तोंड देण्यासाठी व्यवस्थापनाने योजलेल्या क्लृप्त्या, त्याचा हिंसाचार, ढोंगबाजी म्हणून त्याने केलेले उपोषण, वस्तुस्थिती लक्षात आल्यावर कामगारांनीच केलेली त्याची हकालपट्टी आणि पुन्हा शर्मा-नाईक या जोडगोळीकडे आलेले कामगारांचे नेतृत्व हा प्रवास कधी संपतो तेच कळत नाही. **- प्रकाश अकोलकर**

महाराष्ट्र टाईम्स १२.८.२००१

**शशांक मराठे - वेंगुर्ल्यात १ला**



वेंगुर्ले येथील सभासद **श्रीधर केशव** (पृ.३९६), किरात साप्ताहिकाचे संपादक यांचा पुत्र **शशांक श्रीधर** याने १२वी आर्टस्च्या परीक्षेत ७७ टक्के गुण मिळवून वेगुर्ले तालुक्यांत प्रथम क्रमांक मिळवला. तसेच तत्वज्ञान या विषयांत कोल्हापूर विभागांत त्याने सर्वाधिक ९२ गुण मिळवले. मराठे परिवारातर्फे शशांकचे अभिनंदन.

**प्रज्ञा पुरुषोत्तम - डिचोलींत १ली**



बिबक, गोवा येथील सभासद **पुरुषोत्तम विष्णु** (पृ.५२१) यांची मुलगी प्रज्ञा हिने गोवा बोर्डाच्या १२वी आर्टस् परीक्षेत ७८ टक्के गुण मिळवून डिचोली तालुक्यांत प्रथम क्रमांक मिळवला. तिने हिंदीत १०० पैकी ९० गुण मिळवले. परिवारातर्फे प्रज्ञाचे अभिनंदन.

**बारावी गुणवत्तेत ४था सुव्रत चक्रदेव**

पुण्यातील कुलबांधव **प्रफुल्ल लक्ष्मण चक्रदेव (पृ.७३७) यांचा मुलगा सुव्रत** याने १२वीच्या परीक्षेत ९५.६७ टक्के गुण मिळवून गुणवत्ता यादीत ४था क्रमांक मिळवला. त्याच्या फर्ग्युसन कॉलेजात त्याला पहिला क्रमांक मिळाला.

**सौरभ प्रफुल्ल चक्रदेव**

पुण्यातील कुलबांधव **प्रफुल्ल लक्ष्मण चक्रदेव (पृ.७३७) यांचा मुलगा सौरभ** याने महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत (इ. ८वी) २०० पैकी १६९ गुण मिळवून महाराष्ट्रात २रा क्रमांक व रौप्यपदक पटकावले. त्याचप्रमाणे भूगोल प्रज्ञा शोध परीक्षेतहि त्याने महाराष्ट्रात ३रा क्रमांक मिळवला.

**क्रिकेटपटु सुशांत हेमंत**



विलेपार्ले येथील कुलबांधव **हेमंत महादेव यांचा मुलगा सुशांत** याची १६ वर्षाखालील मुलांच्या राष्ट्रीय (क्रिकेट) संघातल्या संभाव्य २५ खेळाडूंमधे निवड झाली आहे. क्रिकेटप्रमाणेच १०वीच्या परीक्षेतहि सुशांतने ८४ टक्के गुण मिळवून त्याचे सव्यसाचित्व सिद्ध केले आहे. क्रिकेटच्या राष्ट्रीय संघांत सुशांतची निवड होवो अशा सर्व कुलबांधवांच्या शुभेच्छा. (सुशांतच्या क्रिकेटमधील पराक्रमांसाठी पहा हितगुज, मार्च २००१)

## चुकीची दुरुस्ती

जून २००१ अंकात 'सहवेदना'मध्ये (पृ.२) विठ्ठल नारायण (पृ.२९१) हे प्रतिष्ठानचे विश्वस्त अरविंद दामोदर यांचे 'काका' असा उल्लेख झाला आहे. काकांऐवजी 'चुलत भाऊ' असे वाचावे. नजरचुकीबद्दल दिलगीर आहो. - संपादक.

## नांदा सौख्य भरे

१) वाडा, जि. ठाणे येथील कुलबांधव **भास्कर दत्तात्रेय** (पृ.२१, दत्तात्रेय विष्णु यांचा पुत्र) **यांची मुलगी सारिका** हिचा विवाह सांगलीचे वासुदेव पांडुरंग दांडेकर यांचेबरोबर ९ मे २००१ रोजी मिरज येथे पार पडला.

२) पुणे येथील कुलबांधव **रमेश केशव खांबेटे** (पृ.६७५) **यांची मुलगी उल्का** हिचा विवाह दत्तात्रय (ऊर्फ गिरीश) श्रीकृष्ण ताम्हनकर यांचेशी ३१ मे २००१ रोजी पुणे येथे झाला.

**नवविवाहित कुलबांधवांना मराठे प्रतिष्ठानच्या शुभेच्छा.**

## सहवेदना

**प्रकाश विष्णू यांची आई सुशीला**

मुंबईतील कुलबांधव **प्रकाश विष्णू** (अथवा रेमन सर्कसमधील एम. पी. कुमारन) **यांची आई सुशीला** (विष्णु शंकर पृ.५०५ यांची पत्नी) हिचे १९.६.२००१ रोजी निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

**पंत मराठे कालवश**



मराठे प्रतिष्ठानचे सभासद **विष्णु बाळकृष्ण** (पृ.३५९) **तथा पंत मराठे** यांचे अल्पशा आजारानंतर २५.७.२००१ रोजी दुःखद निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते.



Marathe Pratishthan

१९४० पासून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघकार्याला वाहून घेतले. १९४३ ते १९४८ पर्यंत रेल्वेत नोकरी केली. १९४८ साली संघावर बंदी आली. बंदीविरोधांत सत्याग्रह केल्याने त्यांची रेल्वेतली नोकरी गेली. पुढे १९५० पासून मुंबई महानगरपालिकेत नोकरी करून १९८५ साली इन्स्पेक्टर (लायसेन्स) म्हणून ते निवृत्त झाले. आपले सामाजिक कार्य मात्र त्यांनी अखेरपर्यंत चालू ठेवले होते. मुंबईतल्या सिद्धिविनायक ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्यांनी अनेक संस्थांना व आजारी व्यक्तींना आर्थिक सहाय्य मिळवून दिले. कुलबांधवांना त्या ट्रस्टच्या विविध योजनांचा पायदा मिळावा म्हणून ते सदैव दक्ष असत.

१९५९ पासून जनसंघाचे व नंतर ते भाजपचे निधीप्रमुख होते. १९९४ सालापासून भाजपचे कोषाध्यक्ष होते. ९ जानेवारी १९९४ रोजी त्यांचा शिवाजी पार्कवर लालकृष्ण अडवाणी यांच्या हस्ते ५० वर्षे सामाजिक कामात कार्यरत असल्याबद्दल जाहीरं सत्कार करण्यात आला होता. तसेच दादा गावकर सामाजिक प्रतिष्ठाननेहि गुणवंत नागरिक पुरस्कार देऊन मागच्याच वर्षी त्यांचा सत्कार केला होता.

'कार्यमग्नता अवघे जीवन' हे पंतांच्या जीवनाचे सार होते. हा वसा आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून घेतल्याचे ते अभिमानाने सांगायचे.

पंत मराठे यांच्या कुटुंबीयांच्या दु:खांत मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे.

---

**मालिनीबाई मराठे**



*मध्यभागी मालिनीबाई, अंध शाळेतील विद्यार्थिनींसमवेत. पाठीमागे ग. वि.*

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष गणेश विनायक **यांच्या सुविद्य पत्नी मालिनीबाई** (पृ.११६) यांचे २३.६.२००१ रोजी दु:खद निधन झाले. गेली २/३ वर्षे त्या आजारी होत्या.

मालिनीबाईंनी मुले मोठी झाल्यावर वयाच्या ३६व्या वर्षी पुन्हा शिक्षण चालू करून हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा मिळवला. वर्षभर एका हॉटेलमधे नोकरी केली. नंतर मुंबईच्या केटरिंग कॉलेजमधे प्राध्यापिका म्हणून १५ वर्षे नोकरी केली. त्याबरोबरच अपत्यसंगोपनाची गृहिणीची जबाबदारीहि त्यांनी उत्कृष्टपणे पार पाडली. मुलगे - श्रीहरी व अनिल आणि मुलगी नीला सर्व उच्चविद्याविभूषित आहेत.

त्याबरोबरच प्रसंगी स्वत:च्या घरात आश्रय देऊनही त्यांनी शैक्षणिक मदत केलेल्या काही मुलीहि आज देशपरदेशात सुस्थिर झालेल्या आहेत. अंधशाळांतून १०वी परीक्षा पास होणाऱ्या मुलींना घरी बोलवून त्यांचा त्या सत्कार करीत असत. त्यांचे पती दररोज घराजवळच्या अंधशाळेत जाऊन तिथल्या मुलींना तास-दोन तास संस्कृत-मराठी-इंग्रजी साहित्य वाचून दाखवण्याचा परिपाठ आज वयाच्या ८०व्या वर्षीहि कसोशीने पाळतात.

दादर-मुंबईच्या केटरिंग कॉलेजमधे २७.७.२००१ रोजी आयोजित केलेल्या शोकसभेला त्यांचे विद्यार्थी, कॉलेजातले सहकारी आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेत प्रतिष्ठानतर्फे कार्यवाह विनायक केशव यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेतर्फे श्री. अरुणराव व सौ. नीलांबरी मराठे यांनी पत्राद्वारे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

मालिनीबाईंच्या आत्म्यास शांती मिळो अशी सर्व मराठे परिवारातर्फे प्रार्थना. ***

---

## समाजकार्य स्वयंसेवक

आम्ही परमेश्वरकृपेने आमच्या सांसारिक जबाबदारीतून सुखरुप पैल आलो. उरलेले आयुष्य देवभक्ती बरोबरच समाजकार्य (तेहि गाजावाजा न करता) करण्याची इच्छा आहे.

प्रतिष्ठानतर्फे जर कोठे 'वनवासी कल्याण आश्रमा' सारखे काम चालू असेल, चालू करायचे असेल तर मी वय वर्षे ६२ व माझी पत्नी मदत करण्यास तयार आहो. मराठे परिवारांत माझ्यासारखे काही जण असतीलच!

- **मनोहर दामोदर** (पृ.२७५) फ्लॅट १०१/१०२, प्लॉट १८९, कानसई सेक्शन, अंबरनाथ ४२१ ५०१ (फोन : ०२५१-६००२६२)

***(आपली भावना अतिशय स्तुत्य. आज तरी असे काही कार्य प्रतिष्ठानतर्फे चालू नाही. आपल्या अगर अन्य कुलबांधवांच्या डोळ्यापुढे काही निश्चित योजना/कल्पना असल्यास प्रतिष्ठानला लिहावे. त्याचा जरूर विचार करण्यात येईल. - संपादक.)***

### भजन न संपावे

मला वाटते। भजन करावे।
देवाचे ते रूप स्मरूनी। चित्त स्थीर व्हावे ।।१।।
देवाचे ते गुण स्मरूनी। सदा लीन व्हावे।।२।।
देवांची ती कीर्ति गाउनी। पावन जगि व्हावे।।३।।
देवांचे ते प्रेम पाहुनी। तृप्त सदा व्हावे।।४।।
देवांची ही हाक ऐकुनी। आनंदे न्हावे।।५।।
देवांची ती मूर्ति पाहुनी। भान हरपुनी जावे।।६।।
देव नी मी आता। एकची व्हावे।।७।।
गाता गाता गात रहावे। भजन न संपावे।।८।।

- **सौ. अर्चना पुरुषोत्तम** (पृ.५२१), बिंबल, गोवा



Marathe Pratishthan

# अखिल भारतीय स्तरावर एका वर्षात दोन सुवर्णपदके पटकावणारी प्रियदर्शिनी मराठे


इंटरनॅशनल युथ एक्चेंजसाठी, भारत सरकारकडून निवड झालेली. ज्युनिअर विंगमधील कर्नाटकातील एकमेव कॅडेट, कु. प्रियदर्शिनी मराठे हिने नेपाळ सरकारच्या आर्मी डे समारोहात फेब्रुवारी २००१ मध्ये भारताचे नेतृत्व केले. नेपाळ येथील समारोहात तिने शास्त्रीय नृत्य-भरतनाट्यम् सादर केले. यापूर्वी एकाच वर्षात अखिल भारतीय स्तरावर एनसीसीची दोन सुवर्णपदके मिळवण्याचा विक्रम प्रियदर्शिनीने केला आहे.

प्रिया ही बेळगावातील प्रसिद्ध डॉक्टर रविकिरण व डॉ. रमा मराठे (पृ.५३५) यांची कन्या. आठवीत असल्यापासून प्रिया एनसीसीमध्ये आहे. एनसीसी कॅंपमध्ये तिने सतत प्राविण्य मिळवले. एनसीसीच्या एकंदर पाच कॅंपमध्ये कर्नाटक-गोवा कॉंटीनजेंटची (ज्युनिअर विंग गर्ल्समधील) सर्वोत्तम कॅडेट म्हणून तिची निवड करण्यात आली व तिने कर्नाटक-गोव्याचे प्रतिनिधित्व केले.

भारताच्या अशा सोळा कॉंटीनजेंटस आहे. त्यापैकी प्रत्येकी एक मुलगी ज्युनिअर विंगममधे कॅडेट म्हणून निवडली गेली. या १६ मुलींना जनरल नॉलेज, आयक्यु टेस्ट, ड्रील, फायटिंग, करंट अफेअर्स, पर्सनॅलिटी, इंटरव्ह्यू, दैनिक व्यवहारातील वागणूक व यापूर्वी मिळवलेले यश अशा सर्वच कसोट्यातून जावे लागले व या सर्वांमध्ये प्रियदर्शिनीची अखिल भारतीय स्तरावर सर्वोत्तम कॅडेट म्हणून निवड झाली. अंतिम फेरीत बिहार, महाराष्ट्र व कर्नाटकच्या प्रतिनिधी होत्या. २५ जानेवारी २००० मध्ये प्रियाला सुवर्णपदकाची मानकरी म्हणून घोषित करण्यात येऊन पंतप्रधानांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याच शालेय वर्षात ऑक्टोबर ९९ मध्ये तिने बेसिक लिडरशीप कॅम्प एनसीसी थलसेनाच्या (बेसिक लीडरशिप) स्नॅपशूटिंगमध्ये सुवर्णपदक मिळविली. एकंदर पाच कॅंपमध्ये तिची निवड होऊन थलसेनेच्या कर्नाटक आणि गोवा कॉंटीनजेंटची प्रतिनिधी म्हणून तिची निवड करण्यात आली.

नवी दिल्ली येथील शेवटच्या कॅंपमध्ये भारतातील विविध राज्यांच्या प्रतिनिधींची स्पर्धा होऊन त्यातही ती अखिल भारतीय स्तरावर सर्वोत्तम व प्रथम क्रमांक ठरली. बिहार, आंध्र प्रदेश व कर्नाटकच्या प्रतिनिधी अंतिम फेरीत होत्या. अखिल भारतीय स्तरावरील हे



*पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांचेकडून सुवर्णपदक स्वीकारतांना*

सुवर्णपदक दिल्ली येथे डेप्युटी जनरल (उत्तर प्रदेश) ब्रिगेडिअर गुरुदयाल सिंग यांच्या हस्ते तिला देण्यात आले. अशा प्रकारे एका वर्षात अखिल भारतीय स्तरावर एनसीसीची दोन सुवर्णपदके मिळवण्याचा मान प्रियाने पटकावला.

२५ जानेवारी २००० रोजी जाहीर झालेल्या सुवर्णपदकाची मानकरी ठरलेल्या प्रियाला सुवर्णपदक, चषक, बॅटन तसेच दिल्ली विभागातर्फे ३००० रु. खासदार चसबराज यांच्यातर्फे १००१ रु. व कर्नाटक डायरेक्टोरेटतर्फे १००० रुपयाचे बक्षिस देण्यात आले. भारताचे एनसीसी प्रमुख, डायरेक्टर जनरल - एनसीसी, लेफ्टनंट जनरल ए. एस. राव यांची २५ जानेवारी २००० स्टीक ऑर्डरली होण्याचा मान तिला मिळाला. २५ वर्षांपूर्वी मध्यप्रदेशाचे प्रतिनिधित्व केलेल्या व सर्वोत्तम कॅडेटचे सुवर्णपदक मिळवलेल्या जया भादुरीला हा सन्मान मिळाला होता. त्यानंतर पंचवीस वर्षांनी प्रियाने हा सन्मान संपादन केला. हा मान बहुतेक सीनिअर विंग कॅडेटस् यांनाच मिळतो, पण ज्युनिअर विंगला प्रियामुळे हा गौरव प्राप्त झाला. इतकेच नव्हे तर एकाच वर्षात एनसीसीची दोन सुवर्णपदके मिळवणारी प्रिया ही कर्नाटकातील एकमेव विद्यार्थिनी आहे.


एनसीसी कॅंप आवडीने पूर्ण करणारी प्रिया भरतनाट्यमही मनापासून करते. रवींद्र शर्मा हे नृत्यातले तिचे गुरू आहेत. हिंदीच्या काही परीक्षा तिने दिल्या असून, कन्नड प्रथम परीक्षेत तिने प्रथम श्रेणी मिळविली आहे. सामान्य ज्ञान (जी.के.) या राष्ट्रीय स्तरावरच्या परीक्षेत ती उत्तीर्ण झाली आहे. भरतनाट्यमच्या परीक्षा तर तिने दिल्या आहेतच. शिवाय कर्नाटक सेकंडरी एक्झामिनेशनच्या चित्रकला परीक्षेत द्वितीय श्रेणी पटकावली आहे. शाळा व विविध ठिकाणी नृत्य व चित्रकलेत अनेक बक्षिसे मिळवली आहेत. माऊंट अबू व बेंगळूर येथे नृत्यासाठी तिला खास आमंत्रित करण्यात आले होते. बॅडमिंटन हा तिचा आवडता खेळ असून आंतरशालेय, आंतरतालुकास्तरावर ती खेळून आली आहे.

अशा अनेक क्षेत्रात संचार करणाऱ्या मुलीचा अभ्यास कसा आहे असा प्रश्न पडेल पण अभ्यासातही ती हुशार आहे. १०वीच्या बोर्ड परीक्षेत तिने जिल्ह्यात पाचवा व इंग्रजी विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे. (९१ टक्के गुण) विशेष म्हणजे या परीक्षेच्या आधी १ महिना ती नेपाळमधे (फेब्रुवारी २००१) होती. परीक्षेआधी केवळ १५ दिवस ती बेळगांवला परतली. या पार्श्वभूमीवर तर तिचे हे यश खचितच अभिमानास्पद आहे. ***



Marathe Pratishthan

# अंधांसाठी स्पर्शलेखन-वाचन पद्धती
# डॉ. श्रीहरी मराठे यांचे संशोधन



अंध माणूस आता कागदावर लेखणीने लिहू शकेल. अगदी डोळसासारखा. ब्रेल लिपी न वापरता. त्यामुळे तो डोळस माणसाशीही पत्रव्यवहार करू शकेल. पुण्यातल्या डॉ. श्रीहरी (पृ.११६) तथा राजा मराठे यांनी अंधांसाठी एक नवीन व साधी स्पर्शलेखन पद्धती शोधली आहे. अंध मुलांना बँकेच्या व्यवहारांसाठी स्वाक्षरी करायला शिकवता येईल काय, असा डॉ. मराठे यांच्या वडिलांना प्रश्न पडला होता. त्यातून डॉ. मराठे यांना ही नवीन पद्धती सुचली, असे त्यांनी सांगितले.

अंधांना लेखन करणे अधिक सुलभ व्हावे यासाठी त्यांनी अनेक नव्या प्रकारच्या शाईंचे व कागदाचे प्राथमिक नमुने तयार केले आहेत. मात्र अधिक चांगल्या प्रकारचा कागद तयार करता यावा असा त्यांचा प्रयत्न आहे. कुंकू, गोंद व वाळूची पूड वापरून त्यांनी शाईही तयार केली आहे. मात्र ती लवकर वाळत नसल्याने अडचण येते. अक्षरांना किमान पन्नास मायक्रॉन एवढी उंची मिळेल व लवकर सुकेल अशी शाई तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. या प्रयत्नात रसायन संशोधकांनी व संस्थांनी सहकार्य करावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.

अंधांसाठी सध्या ब्रेल लिपी वापरात आहे. उठावदार टिंबांचा वापर करून ते लिहितात. जाड कागदावर उजवीकडून डावीकडे लिहीत जायचे व वाचताना कागदाच्या दुसऱ्या बाजूने डावीकडून उजवीकडे वाचायचे, ही पद्धत त्यांना अवलंबावी लागते. या पद्धतीत लेखनाला विलंब लागतो. कागदाची एकच बाजू वापरता येते. डोळसांशी या लेखनपद्धतीत संवाद साधता येत नाही. या त्रुटी डॉ. मराठे यांच्या शोधाने दूर होत आहेत.

या नव्या पद्धतीत अंध लेखणीने डोळसासारखेच लेखन करतील. ही अक्षरे उठावदार असतील. त्यामुळे ती अंध वाचू शकतील. ती दृश्य असल्याने डोळसही वाचू शकतील. डॉ. मराठे यांनी इंग्रजी कॅपिटल अक्षरे ओळखण्यासाठी 'तारा प्रणाली'चा (सिंपल टॅक्टीकल अल्फाबेट रेकग्निशन - स्टार) शोध लावला आहे. या प्रणालीनुसार अंध व्यक्तींचा इंग्रजी अक्षरे ओळखून वाचण्याचा वेग मिनिटाला वीस अक्षरे एवढा वाढला आहे.

डॉ. मराठे हे आयआयटीमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअर झाले आहेत. अमेरिकेत त्यांनी पीएच.डी मिळवली. घरातल्या छोट्या प्रयोगशाळेत ते चुंबकशक्ती, विद्युतशक्ती, लहान इलेक्ट्रिक मोटर, लेसर किरण यांच्या सहाय्याने स्पर्श लेखन-वाचन साधने करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांनी संगणकातील माहिती अंधांना छापील स्वरूपात देण्याची पद्धतीही विकसित केली आहे.

डॉ. मराठे यांनी या शोधांसाठी पेटंट व कॉपीराईटचे अर्ज करायचे ठरविले आहेत. इतर आपमतलबी व्यक्तींना या शोधाचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करू नये एवढाच त्यांचा यामागे उद्देश आहे. या शोधातून त्यांना जे काही उत्पन्न होईल ते अंध व्यक्तींच्या शिक्षणासाठीच खर्च करण्याचे डॉ. मराठे यांनी ठरविले आहे.

**त्यांचा पत्ता** : डॉ. श्रीहरी मराठे, डी-१, पाटील रीजन्सी, एरंडवणे, पुणे ४११ ००४.

फोन : ५४२ ४२०३,

फॅक्स : ५४२ ४२०२,

Email : drmarathe@yahoo.com

***

## खुषीपत्रे

१

जून २००१ चा हितगुज मिळाला. त्यातील सार्वजनिक गणेशोत्सव, गणेशोत्सवातील राष्ट्रजागृती आयकर दात्यांनो सावधान हे विशेष लेख खूपच उदबोधक व प्रशंसनीय.

हितगुजची आम्ही वाट पहात असतो व संग्रही सर्व अंक ठेवतो. कारण पुन्हा वाचणे, दुसऱ्यांना वाचण्यास देणे व स्वतःला रेफरन्स साठी म्हणून आनंद वाटतो.

**- भास्कर दत्तात्रेय** (पृ.२१, दत्तात्रेय विष्णु यांचा पुत्र), वाडा, जि. ठाणे.

२

आपले 'हितगुज' हे त्रैमासिक अगदी वेळेवर येते. त्यातील काही गोष्टी व अनुभव वाचण्यासारखे असतात. मराठे प्रतिष्ठान संस्था ही अनेक प्रकारांनी ज्ञाती बांधवांना व इतरांना देखील उपयोगी पडत आहे. संस्थेने चांगलेच कार्य हाताळले आहे. आम्ही अशा संस्थेचे सभासद आहोत ह्याचा आम्हाला खूप आनंद वाटतो. अशीच ही संस्था नेहमी कार्यरत राहो हीच ईशचरणी प्रार्थना. 'हितगुज' मधील वधू-वरांची माहिती देखील खूप उपयोगी पडते. धन्यवाद.

**- नरेंद्र भास्कर**, बडोदे (भास्कर शंकर, पृ.१५८ यांचा पुत्र)



Marathe Pratishthan

# आमचे दादा

- सौ. अनुराधा अरविंद (पृ.२९१), डोंबिवली

***हे दादा म्हणजे विठ्ठल नारायण (पृ. २९१) १४.१०.१९९९ रोजी प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर गुणवान विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यांत आली होती. फेब्रुवारी २००१ मध्ये वयाच्या ८०व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या 'अनुराधावहिनी'ने त्यांना वाहिलेली ही आदरांजली. - संपादक***

आमचे दादा हे माझे भावोजी होते, मामंजी होते, मार्गदर्शक होते, की आणखी कोण होते?

मला दादा आठवतात ते ६८ सालापासून. चिमुकल्या अश्विनीला उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून एरंडाचं पान डोक्यावर ठेवून तिला सावलीत घेऊन बसणारे दादा. अभिजीतचा म्हणजेच अण्णांच्या नातवाचा अभ्यास घ्यायला, ठाण्याहून उन्हातान्हातून डोंबिवलीला येणारे दादा.

दादा गेले त्यावेळी मला अगदी रडूच कोसळले. अनेक वेळा त्यांच्याशी झालेल्या गप्पा-गोष्टींतून मन तृप्त व्हायचं. घरी परतताना ज्ञानात पडलेली भर भारावून टाकायची मनाला. वाटायचं पुन्हा कधी येईन दादा-वहिनींना भेटायला? लवकरच भेटावं वाटायचं. पण संसारातील अडचणींमुळे, कर्तव्यामुळे मनात येईल तेव्हा आपणास वरिष्ठांना, मित्र-मैत्रिणींना भेटता येतच असं नाही, पण त्यांच्याबद्दलची आपुलकी मात्र त्यामुळे कमी होत नाही.

दादा मुंबईतील रुइयासारख्या नामवंत कॉलेजातून MSc. झालेले आदर्श विद्यार्थी. ते आदर्श विद्यार्थी होते असं त्यांच्या वर्गमित्रांनी सांगितल्यानेच आम्हाला कळले. दादांशी बोलताना त्यांचा हळुवारपणा, आपल्या बोलण्याने दुसऱ्याला दु:ख पोचू नये, यासाठी त्यांची तळमळ, आपल्या कुटुंबाने एकत्र रहावे यासाठीची धडपड. निदान कारणपरत्वे तरी सर्वांनी एकत्र यावे म्हणून नवरात्रात आर्जव करीत बोलावणं. आपण त्यांच्या आमंत्रणाचा कसोशीने स्वीकार करून त्यांच्याकडे जाऊन नवरात्रात म्हटलेल्या आरत्या, प्रसाद घेणे यापलीकडेही दादांच्या चेहऱ्यावर अनुराधा वहिनी आल्याचा आनंद अवर्णनीय असे. कुटुंबातील एकेक माणूस असा जोडून ठेवण्याची दादांची हातोटी आगळीच होती. सर्वांना त्यांच्याविषयी जिव्हाळा, आपलेपणा वाटे. त्यांच्या विद्वत्तेला नम्रतेची झालर होती. त्याच्या आग्रही मतांमागे अभ्यासाची खोली होती. यामुळेच दादांविषयी सर्वांच्या मनात आदरभावना असे.

दादांच्या विद्वत्तेला तेवढीच सक्षमतेची जोड आमच्या वहिनींची लाभली. त्यांच्या दोन मुलांच्या सहवासात त्यांचे जीवन सफल झाले. त्यांच्या हातून खूप समाजसेवा सुद्धा घडली. डॉ. बेडेकरांसारख्या विद्याप्रेमींना सातत्याने जोड लाभली ती आमच्या दोन भाऊजींची. एक म्हणजे कै. रामभाऊ गोखले व दुसरे कै. विठ्ठलराव मराठे. विद्यादान करताना आपल्या अनेक अडचणी त्यांनी बाजूला ठेवल्या. दादांच्या अंत्यदर्शनास आलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांच्या नजरेतली कृतज्ञतेची जाणीव बघून आम्हाला आम्ही दादांची भावंडे असल्याची धन्यता वाटली. तुम्ही अतिशय जाणीवपूर्वक आणि मन:पूर्वक मागच्या पुढच्या पिढ्यांचे हात घट्ट धरले आहेत, एवढंच नाही तर तुमच्या मुलांनाही असे हात हाती घ्यायची आंतरिक उर्मी आहे.

दादांचा दर आठ दहा दिवसांनी फोन असायचाच. एकदा दादांना मी म्हटलं, तुम्ही फोन केल्यावर मला कायम वाटे परस्परसंबंधातील नाते जपणूक दादा करतात. आपण का कधी त्यांना फोन करत नाही? तेव्हांपासून काही महिने मी सुरवात देखील केली, पण खूपच उशीर झाला का? का दादांना असं वाटलं की आपलं नातेसंबंध टिकवण्याचे काम दुसऱ्या कोणीतरी हातात घेतलयं?

दादांचे देव पाहिले, आणि मी त्यांना विचारलं की तुमचे देव सोन्याचे तर नाहीत ना? दादा गालातल्या गालात हसले आणि म्हणाले, 'मी देव घासतो म्हटलं' तेव्हापासून मीही महिन्यातून एकदा



देव घासायला सुरवात केली. त्यांच्याकडून नकळत खूप शिकायला मिळालं. आम्ही दोघं २/२॥ तासांच्या गप्पानंतर घरी यायला निघायचो. प्रत्येक वेळी निरोप देताना दादाच्या डोळ्यात पाणी यायचे. आता दादांचा कायमचा निरोप घेताना आमच्या डोळ्यातून होणारी आसवांची गळती कोणी थांबवायची? अगदी शेवटच्या भेटीत दादांनी ह्यांना त्यांची भेट म्हणून डॉ. यशवंत पाठकांचे 'चांदण्याची पखरण' हे पुस्तक देऊन मायेची पाखर असल्याचा दृष्टांत दिला का?

आता ठाण्याच्या घरात दादा नाहीत. तरीपण तिकडे पाय आपोआप वळतीलच. ती वहिनी, डॉ. राजेंद्र व त्यांचे कुटुंबीय यांनी ती. दादांचा वारसा मायेने जपलाय. आता आम्ही तिथे जाऊ तेव्हा सगळं काही तसंच असेल, पण — पण आमचे आदरणीय दादा नसतील!

* * *

**हसरे हितगुज**

## हसावे की रडावे?

थंडीचे दिवस. एका इस्पितळांत रोग्यांना द्यायला पुरेशी ब्लँकेटस् नसतात. पण तिथली नर्स होती हुषार. तिने सर्वांना ब्लँकेटे पुरवली-आळीपाळीने. त्यातल्या त्यात कमी आजारी माणसाच्या अंगावरचे ब्लँकेट काढले जाते आणि ब्लँकेट नसलेल्याला दिले जाते. ज्याला जाग येईल त्याला झोपलेल्याच्या अंगावरचे ब्लँकेट काढून दिले जाते. अपुरी ब्लँकेटस् अन् थंडी यांच्याशी अशी लढाई लढून रात्र संपते.

- प्रेषक : **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), मुलुंड, मुंबई



Marathe Pratishthan

# आमंत्रण

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यविस्तारासाठी मी व श्री. वि. गो. तथा भाऊसाहेब मराठे बाहेरगावी गेलो असता एका प्रसिद्ध व विद्वान कुलबंधूंची माहिती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने पूर्वसूचना देऊन आम्ही त्या गृहस्थांच्या घरी गेलो.

दरवाजा उघडताना त्या गृहस्थांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून आपण नक्की ठरविलेल्या घरीच आलो आहोत का असा क्षणभर भास झाला.

आम्ही त्या गृहस्थांचे नाव विचारून खात्री करून घेतली. आम्ही टेलिफोनवर घेतलेल्या भेटीच्या वेळेची कल्पना दिली. मराठे प्रतिष्ठानचा संदर्भ दिला. तरीहि त्यांच्या चेहऱ्यावरच्या रेषा बदलत नव्हत्या. आमच्या आणि त्या गृहस्थांमध्ये एक अनोखी पोकळी निर्माण झाली होती. सर्व संवाद खुंटले होते. शेवटी भाऊसाहेबांनी मार्ग काढला.

''बरं येतो आम्ही. आपल्याला आमच्यामुळे त्रास झाला. माफ करा.''

''काय म्हणालात? मराठे प्रतिष्ठानतर्फे आलात? कुलवृत्तांताच्या कामासाठी?''

''हो'' आम्ही उभ्यानीच उत्तर दिलं

आत्ता कुठे त्या गृहस्थांच्या लक्षात आलं की आम्ही लोंबकळत उभे आहोत.

त्यांनी हातानीच खुर्च्यात बसण्यास सांगितलं. आम्ही बसलो. टेबलाजवळच्या खुर्चीत बसत टेबलावरील कागद सारखे करीत ते म्हणाले.

'का हो, जग किती पुढे गेले आहे माहीत आहे? देशाचा विचार करा. जगाचा विचार करा. कसले धर्म आणि कसल्या जाती घेऊन बसला आहात. कुलवृत्तांत. कसलं कुल? आणि कसला वृत्तांत? हे हे सगळं अगदी संकुचित आहे. आपल्याला मुळीच मान्य नाही. असल्या क्षुल्लक गोष्टीसाठी मला मुळीच वेळ देता येणार नाही.'

ते जणू आमचा अभ्यासवर्ग घेत होते. आमचा हा सुसंवाद चालू असताना त्यांच्या सौ. हॉललगतच्या खोलीच्या दरवाज्यात उभ्या राहिल्या होत्या.

''आपण मुंबईहून आलात का?''

''हो''

''कुठे उतरलात? रात्रीचं जेवण कुठे घेणार? आपण चहा घेता ना?''

त्या प्रश्नावर प्रश्न विचारत होत्या. आम्हाला उत्तरं देणं कठीण होतं आणि गप्प राहणंही कठीण होतं.

काय समजायचं ते त्या समजल्या. चटकन् पुढे झाल्या.

''तुम्ही त्यांचं म्हणणं मुळीच मनावर घेऊ नका. प्रत्येक गोष्ट म्हणजे ह्यांच्या तत्वाचा प्रश्न. तत्वाशिवाय इतर गोष्टी आहेत की नाही या जगात? पुस्तकात तेच वाचायचं, लेखातून तेच लिहायचं आणि सभेत तेच बोलायचं. घरगुतीपणा मुळी नाहीच कुठे. जायचं नाही हं काही घेतल्याशिवाय. मी देते सगळी माहिती.''

''खरं सांगायचं म्हणजे आमच्यापेक्षा सौ. वहिनीच जास्त नर्व्हस झाल्या होत्या. यजमानांचं वागणं त्यांच्याच जिव्हारी लागलं होतं.''

चहा झाला. फराळाच्या बशा संपल्या. आम्ही निरोप (सौ. वहिनींचा) घेऊन रस्त्यावर आलो. नाक्यावर रिक्षाची चौकशी करीत होतो.

इतक्यात पाठीमागून कोणीतरी आमच्याकडे धावत येत असताना पाहिलं. तेच ते गृहस्थ धापा टाकीत आमच्याजवळ आले.

''आय एम् व्हेरी सॉरी भाऊसाहेब. मी फारच वाईट तऱ्हेने वागलो.'' जवळ जवळ भाऊसाहेबांना अडवीत ते गृहस्थ बोलू लागले.

आम्हाला या ट्रान्सफरसीनने धक्काच दिला. भाऊसाहेब हळूच मला बोलले, ''वि. के. हे गृहस्थ नेमके तेच आहेत ना? निष्णात नटालासुद्धा एवढा चेहरा बदलता येणार नाही.''

''आज तुम्ही आमच्याकडे मुक्काम केलाच पाहिजे. निदान तुमच्या पंक्तीचा लाभ आम्हाला मिळाला पाहिजे.''

''छे, आम्हाला टाईम टेबल बदलता येणार नाही. ठरल्याप्रमाणे आम्हाला गेलं पाहिजे. ते लोक आमची वाट पहात असणार. सौ. वहिनींनी आमचा चांगला पाहुणचार केलाच की. तुम्ही आमच्याबरोबर बोललात ते तात्विक विचार म्हणून बोलतात. त्यात वैयक्तिक दोषारोप होता कुठे? आपल्याला बोवा तुमच्यासारखी स्पष्टवक्ती माणसं आवडतात. उगीच तोंडदेखलं गोड बोलायचं आणि मागे टिंगल करायची याला काय अर्थ आहे? आणि सार्वजनिक काम करताना थोडं आंबट-गोड असणारच. आम्हाला त्याची सवय आहे. तुम्ही उगीच नाक्यापर्यंत आलात.''

''ते काही नाही. तुम्ही जेवायला थांबला नाहीत. तर तुम्ही रागावला आहात असंच आम्ही समजू.''

कशीबशी त्या गृहस्थांची समजूत घालून आम्ही रिक्षात बसू लागलो. त्या गृहस्थानी आमचं ठिकाण रिक्षावाल्याला समजावून सांगितलं.

रिक्षातून उतरून आम्ही भाड्याची चौकशी केली.

''नाही बोवा. त्या इसमानी मला भाडं आगाऊच दिलं. डबल पैसे घेणारा मी नाही हो.''

त्या गृहस्थाचा हा दुसरा धक्का.

दुसऱ्या दिवशी उजाडता उजाडता ते जोडपं आमच्यासमोर हजर.

आम्ही मनात म्हटलं 'आज आम्हाला हे लोक जवळ जवळ जेरबंद करून जेवायला घेऊन जाणार.'

'किती दिवस मुक्काम?'

'दिवस कसले? आता अर्ध्या तासात निघणार आम्ही'

'म्हणजे आमचा नंबर तुम्ही शेवटचा लावलात.'

'पुढच्या वेळी तुमचा नंबर पहिला लावू आणि तुम्हाला कंटाळा येईपर्यंत पाहुणचार घेऊ. चालेल?' भाऊसाहेबांचा मिस्किल स्वभाव जागा झाला.

''मग आत्ताच आमंत्रण देऊन ठेवतो. मुंबईला गाडीत बसण्याअगोदर आम्हाला कळवा. स्टेशनवरूनच तुम्हाला पळवू. उगीच दुसऱ्यांचा क्लेम नको.''

मतभेदाचं धुकं वितळून गेलं होतं. स्नेहाचे, आपलेपणाचे किरण स्वच्छ पसरले होते.

***



Marathe Pratishthan

# नामांकन (Nomination)

- उदय दत्तात्रय (पृ.३२६), मुलुंड, मुंबई

*नॉमिनेशन केलेले नसल्यास माणसाच्या मृत्यूनंतर वारसांना त्याचे बँकेतील, पोस्टांतील, प्रॉ. फंडाचे, पेन्शनचे, विम्याचे पैसे मिळण्यात खूप अडचणी येतात. आपले कुलबांधव, विमाव्यावसायिक श्री. उदय मराठे यांनी अनेकांना अशा अडचणीतून मार्ग काढायला मदत केली आहे आणि म्हणून 'मुळावरच घाव घालावा' या दृष्टीने नामांकनाबाबत प्रत्येकाने काय काळजी घ्यावी याबाबतचे त्यांचे हे सूत्रबद्ध विचार सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील. - संपादक.*

श्री. गणपतराव आपल्या कुटुंबीयांसोबत मुंबईला निवृत्तीनंतर सुखी आयुष्य जगत होते. कुटुंबियांमध्ये त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई व सुपुत्र श्री. केदार व मंदार ह्यांचा समावेश होता. दोन वर्षापूर्वी त्यांच्या पत्नीचे अल्पशा आजाराने निधन झाले. गेल्याच महिन्यात मोटर सायकल चालकाच्या धडकेने गणपतरावांचे अपघाती निधन झाले. वरील प्रकाराने श्री. केदार व मंदार ह्यांच्यावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली.

धक्क्यातून सावरलेल्या पुत्रांनी वडिलांच्या कागदपत्रांची छाननी करायला सुरवात केली तेव्हा काही विमा पॉलीसीवर लक्ष्मीबाईंचे नामांकन होते व कॅश सर्टिफिकेट व इतर गुंतवणुकीत कोठेही नामांकन नव्हते. कै. गणपतरावांची कागदपत्रे मार्गी लावताना श्री. केदार व मंदार ह्यांना योग्य ते मार्गदर्शन व मदत करण्यात मी पुढाकार घेतला.

त्यांना ज्या अडचणी आल्या त्यावरून आपणास धडा घ्यायला हरकत नाही. ज्या गोष्टीमुळे मुलांना त्रास झाला ती म्हणजे 'नामांकना'चा अभाव. (सदर उदाहरणात कुटुंबीयांची नावे जरी बदललेली असली तरी वस्तुस्थिती खरी आहे.) यावरून नामांकनाचे महत्त्व लक्षात येईल. नामांकन कुठे कुठे लागते ते कुलबांधवांना सुचवावे म्हणून हा प्रयत्न.

**अ) नामांकन कोठे लागते?**

१) **बँकेतील खाती** - बचत/चालू; रिकरिंग, टर्म डिपॉझीट, कॅश सर्टिफिकेट इ.
२) **पोष्टातील खाती** - मंथली इनकम स्कीम, बचत/रिकरिंग खाती, नॅशनल सेव्हींग स्कीम खाते, नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट, किसान विकास पत्र इ.
३) **नोकरीत असताना** - प्रॉव्हीडंट फंड, EPF/GPF/VPF, ग्रॅच्युइटी, PPF, पेन्शन
४) **गुंतवणूक** - रोखे, शेअर्स वगैरे
५) **स्थावर मालमत्ता** - घरदार/जमीन जुमला
६) **विमा** - जीवन विमा, अपघाती विमा

**ब) नामांकनाबाबत महत्त्वाच्या गोष्टी**

वरील सर्व कागदपत्रांमध्ये नामांकनाची आवश्यकता केव्हा लागते ह्याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. नामांकन कधी करावे याबाबतचे सर्वसामान्य नियम -

१) वर नमूद केलेली कागदपत्रे पूर्ण करण्याचे सोपस्कार करताना सुरवातीलाच नामांकन करावे.
२) लग्नापूर्वीचे दस्तऐवजांवर लग्नानंतर नामांकन बदलावे.
३) घटस्फोट मिळाल्यानंतर
४) कर्जासाठी तारण म्हणून assign केलेल्या कागदपत्रांवर reassignment नंतर पुन्हा.
५) नामांकन केलेल्या व्यक्तीच्या मृत्यू पश्चात
६) मायनॉरच्या नावे काढलेल्या विमा पॉलिसी मुलगा सज्ञान झाल्यावर म्हणजेच मुलगा किंवा मुलगी १८ वर्षे पूर्ण झाल्यावर.
७) मुख्यत्वे पेन्शन प्लॅन मध्ये पर्यायी नॉमिनेशनची सुविधा (जीवन अक्षय/जीवन सुरक्षा) वरील प्लॅन मध्ये सुरवातीलाच उपलब्ध असते व ही बाब विमा काढतेवेळी लक्षात घेणे आवश्यक आहे.

प्रत्येकाने स्वतःचे मृत्युपत्र करावे असा सल्ला वकील देतात. त्यामुळे नामांकनाचे प्रश्न उरत नाही. पण स्वतःचे मृत्युपत्र तयार करण्यांला ५% व्यक्तीसुद्धा तयार नसतात कारण ही संकल्पना त्यांच्या मनाला पटण्यासारखी नसते. अशा वेळेस वर सुचविल्याप्रमाणे आपल्या कागदपत्रांची, 'नामांकन' संबंधात आपणच काळजी घेतली तर कुटुंबीयांवर भविष्यात येणाऱ्या अडचणींवर मात करणे शक्य होईल. ***

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिति 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.*

**क्र. २/२००१ वधू** नीता बळवंत पेठे, जन्म १८.६.१९७८, उंची - ४'-११'', बी.कॉम व कॉम्प्युटर कोर्स D.C.A., A.D.C.P., DTP चालू. आई शिक्षिका, वडील खाजगी कंपनीत नोकरी, दोन भाऊ विद्यार्थी, **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - बळवंत लक्ष्मण पेठे, 'समाधान', मणियासा सोसायटीजवळ, मणिनगर (पूर्व), अहमदाबाद - ३८० ००८. दूरध्वनी - २७४००७६. (म. प्र. चे सभासद प्रकाश गणेश विद्वांस पृ.६५४, यांची भाची)

**क्र. ३/२००१ वर** मनीष काशिनाथ दातार, कोकणस्थ, गोत्र शांडिल्य,



Marathe Pratishthan

जन्म - ५.१२.१९७४, उंची - ५'-८'', DCE. बिल्डर, स्वत:च्या फर्मस्, (मा. प्रा. २०,०००,) जबलपूर येथे स्थायिक, वडील सेवानिवृत्त आर्किटेक्ट, नातेवाईक पुणे व सांगली येथे. **संपर्क** - के. बी. दातार, ७५६ आर्चिडेन, विजयनगर, जबलपूर (म.प्र.) ४८२००२. फोन - ६४२०५७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ४/२००१ वर** गजानन ऊर्फ हेमंत भगवान आपटे, कोकणस्थ, जन्म - २८.१२.१९७२, ५'-२'', बी.कॉम. फॅब्रिकेशन, मा. प्रा. ६ ते ७ हजार पंढरपूर येथे घर व शेती. आई, वडील, एक बहीण अविवाहित. **अपेक्षा** - अनुरुप. **संपर्क** - अ. रा. आपटे, आपटे वाडा, घ. नं. ३३५६, चंद्रभागा घाटाजवळ, पंढरपूर - ४१३३०६. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ५/२००१ वर** सुमेध दिनकर जोशी, कोकणस्थ, शांडिल्य गोत्र, जन्म - ७.८.१९६८, उंची - ५'-६'', १०वी पास, पौरोहित्य व बागायत, आई-वडील, एक अविवाहित बहीण, ५ विवाहित बहिणी, **संपर्क** - दिनकर गोपाळ जोशी, देऊळवाडा, मालवण - ४१६६०६. (जि. सिंधुदुर्ग), फोन : ०२३६५-५२९९३ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून

**क्र. ६/२००१ वर** सुधीर दत्तात्रय जोशी, कोकणस्थ, गोत्र - शांडिल्य, गोरा, २३.३.१९६४, उंची ५'-६'', बी.कॉम, बँक ऑफ इंडिया, रोहा येथे नोकरी, मालवण येथे घर, २ भाऊ विवाहित, ३ बहिणी विवाहित, आई-वडील नाहीत, **संपर्क** - वसंत दत्तात्रय जोशी, २/१० आर्यकृष्ण अपार्टमेंट, कुळगांव (बदलापूर) ४२१५०३. फोन - ०२५१-६९४३०८. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ७/२००१ वर** अमित भालचंद्र जोशी, कोकणस्थ, गोत्र-शांडिल्य, जन्म - २०.१.१९७२, उंची ५'-८ १/२'', डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनियरिंग, बजाज टेंपो मधे कायम नोकरी (रु. ६,००० पगार) सुभाषनगर येथे बंगला, आई-वडील, एक भाऊ घटस्फोटित, **अपेक्षा** - अनुरूप, पुण्यात नोकरीस प्राधान्य, **संपर्क** - भालचंद्र जोशी, तथास्तु जलाराम मंदिराजवळ, सुभाषनगर, मिरज (जि. सांगली) ४१६४१० फोन : ०२३३/ २६७५३८. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ८/२००१ वर** सुबोध सुरेश ओगले, कोकणस्थ, गोरा, गोत्र-काश्यप, जन्म - ११.१०.१९७२, उंची ५'-६'', I.T.I. ड्राफ्टस्मन, (मा.प्रा. रु. ७,०००) घर, प्लॉट, स्वत:चा दुकानगाळा, **संपर्क** - सौ. लता सुरेश ओगले, द्वारा एम्. एन्. पवार, फ्लॅट नं. ५, शांती क्लिनिक मागे, सांगली, फोन : ३२५३३२. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ९/२००१ वर** विवेक श्रीकृष्ण कुळकर्णी, देशस्थ, जन्म - २८.७.१९७१, उंची ५'९'', M.E. Production, किर्लोस्कर कमिन्समधे नोकरी, **संपर्क** - श्रीकृष्ण उद्धव कुलकर्णी, ४५, पंचवटी, संयुक्त महाराष्ट्र सोसायटी, राजाराम पुरी, कोल्हापूर ४१६ ००८ फोन : ०२३१-५२१२४७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचे मार्फत)

**क्र. १०/२००१ वर** मिलिंद मुरलीधर जोशी, देशस्थ, गोत्र-भारद्वाज, जन्म - ९.१२.१९७३, उंची ५'-८'', B.E. (Elec. & Tele.) सांगली येथे सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कायम नोकरी, (मा.प्रा. रु. ७,०००), आई-वडील, एक बहीण विवाहित), **संपर्क** - मु. गो. जोशी, 'सावली', वारणाली रोड, विश्रामबाग, सांगली - ४१६४१५. फोन : ३०५३८६.(म.प्र. वधूवर माहिती केंद्र, यांचे मार्फत)

**क्र. ११/२००१ वर** शाम ऊर्फ दीपक विनायक देशपांडे, देशस्थ, जन्म - २५.६.१९७०, उंची ५'-५'', M.A., नोकरी व सिमेंट एजन्सी, (मा.प्रा. रु. ८,५००) उत्तम आर्थिक परिस्थिती, स्वत:ची दोन घरे, वडील निवृत्त, आई इन्कम टॅक्स इन्स्पेक्टर, **संपर्क** - वि. रा. देशपांडे, ७२२/३ए, व्यंकटेश अपार्टमेंट, जुना वाशी नाका, कोल्हापूर. फोन : ६२६९७४. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली यांचे मार्फत)

**क्र. १२/२००१ वर** भाग्येश माधव जोशी, कोकणस्थ, गोत्र-शांडिल्य, जन्म - २५.१२.१९७३, उंची ५'-५ १/२'', बी.कॉम, पीजीडीबीए, मा.प्रा. १०,०००, आई-वडील - दोघेहि सेवा निवृत्त, बहीण १ विवाहित. **अपेक्षा** - कुठल्याहि ब्राह्मण शाखेची गोरी तरतरीत सुदृढ, किमान ५'-३'', पदवीधर (वाणिज्य शाखेची अधिक चांगली), नोकरी असल्यास हवी, नसल्यास करण्याची तयारी हवी, मनमिळावू सडपातळ, एकत्र राहण्याची तयारी हवी, **संपर्क** - सौ. विद्या माधव जोशी (पृ.४२७ - कृष्ण सखाराम यांची मुलगी), प्लॉट न. ४६, मंगलमूर्ती को. हौ. सोसायटी, पाठारे पार्कजवळ, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१. फोन : ०२५१-६८८७२१. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचे मार्फत)

**क्र. १३/२००१ वर** अमोल अरविंद परांजपे, कोकणस्थ, गोत्र-विष्णुवृद्ध, जन्म - १२.७.१९७४, उंची ५'-५'', बी.ई., एम्.बी.ए., इंडालमधे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, पगार रु. १३,०००, आई नाही, वडील व १ अविवाहित बहीण, **अपेक्षा** - कोकणस्थ, वाणिज्य पदवीधर, कॉम्प्युटर लिटरेट, पत्रिका पाहणे आहे, उंची अनुरूप, नोकरी हवीच असे नाही, **संपर्क** - अरविंद हरी परांजपे, ए ब्लॉक, ११ ए, नारायणदत्त निवास, डी. एल. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ००८. फोन : ४३०७८४१. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचे मार्फत)

**क्र. १४/२००१ वधू** अश्विनी प्रकाश विद्वांस, कोकणस्थ, गोत्र-कपि, जन्म - २९.१.१९७७, उंची ४'-३ १/२'', एम्.बी.ए. (गुजरात युनि.), खाजगी कंपनीत नोकरी, चष्मा आहे, लेन्स लावते, प्रकृति निकोप, सडपातळ बांधा, ब्लड ग्रुप-बी पॉझिटिव्ह, **अपेक्षा** - इंजिनिअर, डॉक्टर, उच्चशिक्षित, मा. प्रा. रु. १०,००० चे वर, **संपर्क** - प्रकाश गणेश विद्वांस (पृ.६४५), 'शिवम', म्युनिसिपल स्कूल नं. ८ समोर, मणिआसा सोसायटी,

Marathe Pratishthan

मणिनगर (पूर्व), अहमदाबाद - ३८० ००८. फोन : २७७९१११२.

**क्र. १५/२००१ वर** धनंजय गजानन मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ११.११.१९७५, निमगोरा, उंची ५'-१०'', सडपातळ, B+ve, SSC. ITI मेकॅनिकल ड्राफ्समन, पिंपरी येथील टेल्कोमधे डाय डिझायनर,मा.प्रा.१२,०००/- मुलाला आई वडील, १ मोठा भाऊ विवाहित, १ लहान भाऊ नोकरी करतो, स्वत:चे घर आहे, गाण्याची आवड आहे, **अपेक्षा** - गोरी, १२वी किंवा पदवीधर, DME किंवा कॅड, कॉम्प्युटर येत असल्यास उत्तम, शक्यतो कोकणस्थ, **संपर्क** - गजानन बाळकृष्ण मराठे, सन व्ह्यू, ८बी, स्वामी समर्थ मंदिरासमोर, वास्तु उद्योग जवळ, पिंपरी, पुणे ४११ ०१८, फोन : ७४८४९५३, ७४५९२१५. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १६/२००१ वर** श्रीराम गोपाळ नानजकर, देशस्थ, जन्म - २७.३.१९६९, गोत्र-जमदग्नी, उंची ५'-६'', B.Com., स्टँप व्हेंडर व STD बूथ, मा. प्रा. ५,०००/-, गहू वर्ण, सडपातळ, O+ve. मुलाला आई वडील व २ विवाहित बहीणी आहेत. **अपेक्षा** - B.Com., नोकरी सरकारी किंवा बँकेत, **संपर्क** - गोपाळ बाळकृष्ण नानजकर, १३४, शनिवार पेठ, आपटे घाट, पुणे ३०, फोन : ४४६५८७८. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १७/२००१ वर** हर्षद मधुसूदन देवधर, कोब्रा, गोत्र-कौशिक, जन्म - ९.४.१९७१, उंची ५'-८'', S.S.C. व शॉर्ट कोर्सेस, मुलाचे स्वत:चे डेकोरेलचे दुकान असून विविध एजन्सी आहेत, मा. प्रा. ४ ते ५ हजार, मध्यम बांधा, गोरा वर्ण, मुलाला आई, वडील (स्टेट बँकेतील निवृत्त अधिकारी), १ विवाहित बहीण, स्वत:चा बंगला आहे, **अपेक्षा** - शक्यतो कोकणस्थ किंवा कऱ्हाडे, मुलाच्या आई वडीलांजवळ राहण्यास तयार असणारी, **संपर्क** - श्री. मधुसूदन सदाशिव देवधर, 'उत्कर्ष' स्टेट बँक सोसायटी, बंगला नं. ३, न्यू आग्रा रोड, नाशिक १, फोन :९५२५३-५९६५३०(सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १८/२००१ वर** श्रीधर भानुदास ठाकूरदेसाई, कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र-कौशिक, जन्म - १६.२.१९७३, उंची ५'-४ १/२'', गोरा, मध्यम बांधा, B.Com., अरविंद मिल-कलोल गुजराथ येथे मशीन ऑपरेटर, मा. प्रा. ४,०००/-, मुलाला आई वडील व २ विवाहित भाऊ आहेत, **अपेक्षा** - १२वी, गोरी,गुजराथमधे राहण्यास तयार असलेली, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची, **संपर्क** - श्री. भानुदास गोपाळ ठाकूरदेसाई, ५६० दत्तवाडी, साईबाबा मंदिराजवळ, पुणे ३०, फोन : ४३३८७५५, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १९/२००१ वर** निवृत्ती अविनाश भिडे नित्युंदन गोत्र-कोब्रा, जन्म - २२.१०.१९७१, उंची ५'-१०'', BSL, LLB, LLM, स्वत:चे हॉटेल आहे. मा. प्रा. १०,०००/-, वर्ण गोरा, मजबूत बांधा, AB+ve, मुलाला आई, वडील, मोठी बहीण आहे, **अपेक्षा** - मिळून मिसळून वागणारी, सर्व कामात मदत करणारी, **संपर्क** - अविनाश पुरुषोत्तम भिडे, ५७५ नारायण, देवळे वाडा, पुणे - ४११ ०३०. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. २०/२००१ वर** प्रविण बाळकृष्ण साळवेकर, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-काश्यप, जन्म - ९.२.१९७०, उंची ५'-६'', B.Com., DCA, DTL, मंत्री हाऊसिंगमधे अकौटंट, मा. प्रा. ७,०००/-, सडपातळ, गोरा, मुलाला आई वडील असून १ मोठा भाऊ व १ लहान बहीण विवाहित, **अपेक्षा** - पदवीधर, देशस्थ ऋग्वेदी, **संपर्क** - बाळकृष्ण गोविंद साळवेकर, रुम नं. १९, सुखसागर नगर भाग २, खंडोबा मंदिराजवळ, कात्रज, पुणे ४६, फोन : ६९६११६३, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. २१/२००१ वर** चिंतामणी अनिल मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, M.Sc. Organic Chemistry, उंची ५'-९'', Hitech Drilling Servises & Tata Enterprises चेन्नई (मद्रास) येथे Production Manager, मा. प्रा. १५,०००/-, निमगोरा, मध्यम बांधा, A+ve, मुलाला आई आहे, वडील नाही, १ लहान भाऊ बँकेत नोकरी करतो. स्वत:चे वडीलोपार्जित घर आहे, तबला वाजवतो, **अपेक्षा** - पदवीधर, शक्यतो कोकणस्थ, मद्रास व राजगुरु नगर दोन्हीकडे राहण्यास तयार असलेली, देशस्थ ऋग्वेदी, **संपर्क** - श्रीमती नीला अनिल मराठे, २९० मोती चौक, राजगुरुनगर ४१० ५०५. फोन : ९५२१३५-२३४३६, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. २२/२००१ वधू** कु. गंधाली गोविंद मराठे, जन्म - २२.०६.१९८०, कोकणस्थ ब्राह्मण, कपी गोत्री. शिक्षण - आर्टस् बी.ए. तृतीय वर्ष चालू, उंची - ५'-२'', मध्यम जाडी, गोरा वर्ण, मुलीला आई वडील व एक भाऊ असून तो तंत्रनिकेतन दुसऱ्या वर्षाला आहे. वडील सरकारी प्रा. शिक्षक (निवृत्त), स्वत:चे घर आहे व थोडीशी बागायती. **अपेक्षा** - २६ ते २८ पर्यंत वय, स्वत:चे घर, आई-वडील, सरकारी नोकरी, इंजिनिअर, ऑफिसर, गोरा, निर्व्यसनी,गोवा किंवा बेळगाव, सांगली, कोल्हापूर. **संपर्क** - गोविंद नारायण मराठे, डॉमनिक प्लाझा, २रा मजला, मु.पो. तिस्क, उसगांव, फोंडा रोड, गोवा - ४०३ ४०६.

**क्र. २३/२००१ वर** संजय अरविंद बागूल, गोत्र-वासिष्ठ, जन्म १७.३.१९७०, उंची - ५'-४ १/२'', H.S.C., NCVT (Air conditioning & Refrigeration), सेंट्रल रेल्वेत नोकरी - A.C. Coaching, पगार ६००० अधिक, व्यावसायिक प्राप्ती, वडील नाहीत, आई आहे. मोठा भाऊ विवाहित, बहीण नाही. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - श्रीमती आशा अरविंद बागूल, जोशी वाडा, टिळक चौक, कल्याण. दूरध्वनी - २०८२६६. (श्रीनिवास भालचंद्र, पृ.१६३ यांचे मार्फत)

**क्र. २४/२००१ वर** मंदार सुरेश खांबेटे, कोकणस्थ, गोरा, गोत्र-कपि, जन्म -

Marathe Pratishthan

१८.११.१९७३, उंची - ५'-११'', Blood Group - 'O' Positive, शिक्षण - १२वीं कॉमर्स पास, आई वडील आहेत, व एक लहान भाऊ शिकत आहे, आईने Voluntary Retirement घेतली आहे, वडील Reserve Bank of India मध्ये नोकरीला आहेत, मुलाचा व्यवसाय तळेगांव (दाभाडे) जि. पुणे येथे स्वत:चे General Stores आहे, मासिक प्राप्ती - रु. ८०००, तळेगांवला बंगला आहे, तळेगावला वस्ती वाढत असल्याने व्यवसाय अजून वाढेल. **अपेक्षा** - मुलगी किमान एस.एस.सी. पास हवी व नोकरी नको, अनुरूप. **संपर्क** - श्री. सुरेश नारायण खांबेटे, A-१३, गोकुळ निवास, कोटणीस पथ, माहीम, मुंबई - ४०० ०१६. फोन - ४४६८६७७.

**क्र. २५/२००१ वधू** अनिता अशोक फडके, वय - २७ वर्षे, उंची ५ फूट, रंग - गोरा, शिक्षण - B.A., २ वर्षाचा कॉम्प्युटर कोर्स, Self Employed (कॉम्प्युटर प्रशिक्षण व कॉम्प्युटर संबंधीत कामे), आई वडील व धाकटी बहीण आहे, **अपेक्षा** - कोकणस्थ, अनुरूप, नोकरी/व्यवसाय, **पत्रिका बघायची आहे**. **संपर्क** - ९५२५१-८६०७६६. (प्रतिष्ठानचे सभासद उदय दत्तात्रय, पृ. ३२६, यांचेमार्फत.)

**क्र. २६/२००१ वधू** कविता वसंतराव चोळकर, गोत्र-अत्रि, कोकणस्थ ब्राह्मण, जन्म - ५.१२.१९७९, रंग - सावळा, प्रकृति उत्तम, उंची - ५'-००'', चष्मा आहे, मंगळ नाही, रक्तगट - A Positive, शिक्षण - B.Com. (Gold Medalist in Marketing), M. S. University of Baroda, M.Com. Final Year Study, D.B.M. Diploma in Business Management चालू, संगीताची आवड, नोकरी शिक्षण पूर्ण झाल्यावर करावयाची आहे, वडील - कॅनरा बँकेत ऑफिसर, आई - घरकाम, एक लहान भाऊ - शिक्षण चालू, **अपेक्षा** - कोकणस्थ ब्राह्मण, उच्च पदवीधर, चांगली नोकरी, व्यवसाय, कुटुंब वत्सल घर असावे. **संपर्क** - वसंत भालचंद्र चोळकर, ५-B, बेला अपार्टमेंटस्, मनीषा सोसायटीमागे, वासना रोड, वडोदरा - ३९० ०१५. फोन : ३३४४०३.

**क्र. २७/२००१ वर** संतोष मधुकर ओक, जन्म - १३.७.१९६६, कोकणस्थ, गोत्र - वासिष्ठ, उंची - ५'-१०'', सडपातळ, गोरा, रक्तगट - A+, व्यवसाय - कॉम्प्युटर क्लास, सायबर कॅफे (स्वत:ची प्रशस्त जागा), मासिक उत्पन्न - रु. १२,००० ते रु. १५,०००, वडील - सेवा निवृत्त. आई - गृहिणी. **अपेक्षा** - नोकरी करणारी किंवा कंप्युटर शिकण्याची आवड. **संपर्क** - सौ. माधुरी ओक, ३-शिव प्रसाद, डॉ. राजेंद्र पथ, टिळक नगर, मानव कल्याण केंद्राजवळ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१ २०१. घरचा फोन - (९५२५१) ४३०२६६. (राजा मराठे, मालाड, मुंबई यांचे मार्फत)

**क्र. २८/२००१ वर** समीर मधुकर ओक, जन्म - ६.१०.१९६७, कोकणस्थ, गोत्र-वासिष्ठ, उंची - ५'-१०'', बांधेसुद - गोरा, शिक्षण - B.Com., व्यवसाय - स्वत:च्या जागेत कॉम्प्युटर क्लास तसेच टाईपिंग/शॉर्टहॅन्डचे क्लासेस. मासिक उत्पन्न - रु. १५००० चे आसपास, वडील - सेवा निवृत्त, आई - गृहिणी, मोठी बहीण विवाहित, एक भाऊ अविवाहित. **अपेक्षा** - कॉम्प्युटरची आवड, नोकरी असली तरी चालेल. **संपर्क** - सौ. माधुरी ओक, ३-शिव प्रसाद, डॉ. राजेंद्र पथ, टिळक नगर, मानव कल्याण केंद्राजवळ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१ २०१. घरचा फोन - (९५२५१) ४३०२६६. (राजा मराठे, मालाड, मुंबई यांचे मार्फत)

**क्र. २९/२००१ वर** संतोष अरविंद दातीर, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - १८.५.१९६८, उंची ५'-३'', शरीर-बांधा - सुदृढ-निकोप, चष्मा नाही, F.Y.B.A. व्यवसाय - वडिलोपार्जित धंदा - बडोदा (गुजरात) मधील प्रतिष्ठित सायकल व्यापारी, मा.प्रा. रु. ६-७ हजार, बडोदा येथेच स्थावर २ घरे, घरी आई-वडील, मोठा भाऊ विवाहित, बहीण नाही. **संपर्क** - अरविंद कमलाकर दातीर, G.P.O. जवळ, दातीर सायकल स्टोर्स, रावपुरा, बडोदा - ३९० ००१. फोन : ४१४६७६. (प्रभाकर त्रिंबक विद्वांस, बडोदा, यांचेमार्फत)

**क्र. ३०/२००१ वधू** निकेता विजय दातीर, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - ७.१०.१९७८ उंची - ५'-१'', बांधा - मध्यम, गहूवर्ण, चष्मा नाही. शिक्षण - B.Sc (Home) इंग्रजी माध्यम, कॉम्प्युटर कोर्स, Interior Design - NIFD मधून डिप्लोमा, आई SBI मध्ये नोकरी, वडील खाजगी कंपनीतून निवृत्त, मोठी बहीण विवाहित. बडोद्यास स्वत:चे घर, गाडी वगैरे. **अपेक्षा** - सुस्थितीतील, अनुरूप, पदवीधर, चांगली नोकरी असलेला. **संपर्क** - विजय कमलाकर दातीर, १०, भावेशनगर सोसायटी, अरुणाचल सोसायटी रोड, सुभानपुरा, बडोदा - ३९० ०२३. फोन : ३९४२५१. (प्रभाकर त्रिंबक विद्वांस, बडोदा, यांचेमार्फत)

**क्र. ३१/२००१ वधू** प्रज्ञा अरुण मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २३.४.१९७३, शिक्षण - BE Civil 1st class M. S. University Baroda, Diploma in Information Systems Management (Aptech), Diploma in Autocad, संगीत विशारद, डिझाईन इंजिनियर म्हणून बडोदा येथे नोकरी. उंची - ५'-१'', रंग - गोरा, सडपातळ, दिसण्यात स्मार्ट, चष्मा नाही, मुलीस आई-वडील, १ मोठी बहीण (विवाहित), वडील औद्योगिक न्यायालयातून न्यायाधीश पदावरून निवृत्त, सध्या व्यवसाय, आई - राष्ट्रीयवृत्त बँकेतून स्वेच्छा निवृत्त, बडोदा येथे स्वत:चे घर. **अपेक्षा** - इंजिनियर, उच्चशिक्षित, शाकाहारी, संस्कारी, शक्यतो उंच असावा. (५'-६'' ते ५'-९'' पर्यंत) **संपर्क** - श्री. अरुण भिकाजी मराठे, 'अभिराम', ५ नीलकंठ पार्क सोसायटी, किरणनगर सोसायटी जवळ, मांजलपूर, बडोदा - ३९० ०११. फोन : ०२६५-६४२८८७.

- Spread Happiness - Some of it will stick on to you too.
- When money speaks, the truth is silent.



Marathe Pratishthan

# भूक

- **सौ. साधना सुधाकर** (पृ.५८)
नागांव, जि. रायगड

आज सकाळपासून पावसाने जोर धरला होता. पाऊस उघडण्याची काही चिन्ह दिसत नव्हती. खाटल्यावर गळ्यापर्यंत पांघरुण घेऊन महादू झोपून राहिला होता. त्या छोट्याशा चाळवजा खोलीत, त्याच्या मुलाची म्हणजे येशाची बिऱ्हाडाची जागा होती. त्याची बायको म्हणजे महादूची सून शेवंता खोलीच्याच एका कोपऱ्यात स्टोवर भाकऱ्या भाजत होती. भाकरीचा खरपूस वास नाकात शिरत होता. येशा पहाटेच सहाला डबा घेऊन कारखान्यांत गेला होता. शेवंताची पण कामावर जाण्याची घाई असायची. दोन्ही पोरांना ग्लासातून लालभडक चहा देऊन त्यांच्या हातात एकेक भाकरीचा तुकडा देऊन तिने राहिलेल्या पिठाच्या भाकऱ्या करून त्याच तव्यावर कांदा मिरच्या परतून झणझणीत कोरड्यास केलं होतं. त्या वासाने महादूंची भूक चाळवली. न राहून त्याने शेवंतास हाक मारली ''ए शेवंता, वाईच थोडा च्या तरी दे. खर म्हणजे भाकरीच म्हणणार हुतो पण आताच भाकरी खाऊन दुपारच्याला काय म्हणून नाही मागत''

''बर बर, देत्ये. गुमान पडून ऱ्हावा. काय मेलि रामप्रहरी कटकट. मी म्हणत्ये येवढ्या वयाला भूक लागते तरी कशी सकाळला'' अस म्हणत तिने कोरड्याचा तवा उतरवुन त्याच्याकडे तुच्छतेने पाहत जर्मनच्या पातेलीत चहाच आधण ठेवल. चहा तयार होताच त्याच्यापुढे कप बशी ठेवत ती म्हणाली, ''आता लवकर घ्या, नाहीतर थंड झाला म्हणून बडबड करत ऱ्हावाला. ए पोरांनो चला की अंगुळीला शाळत जायच हाय न्हव का? का बसताय आजाच्या संगतीला. चला अुठा बघु'' अस म्हणत दोघांच्या पाठीत धपाटे घालत तिने त्यांना मोरीत नेल. तिने चहाचा कप ठेवताच महादूने सावकाश उठून चहाचा एकेक घोट घेत त्याने घसा शेकून घेतला. चहा संपवून तो तसाच खाटल्यावर आडवा झाला. शेवंताने स्वत:चे व पोरांचे आवरून ती घराबाहेर पडली. जाताना त्याला दाराला कडी घालण्यास सांगण्यास ती विसरली नाही. तिला नवीनच काम मिळाले होते. पण मधे दुपारची अर्धा पाऊण तासाची सुट्टी मिळे. त्यात ती येऊन पोरांचे व महादूचे जेवण खाण उरकत असे.

ती व मुले जाताच महादूने सावकाश उठत स्टो जवळ झाकून ठेवलेल्या तव्यावरचे झाकण काढले. कोरड्याच्या झणझणीत खमंग वासाने त्याच्या जिभेला पाणी सुटले. त्याने जवळच असलेल्या थाळीत भाकरीचा तुकडा व कोरड्याचा घास घेतला. पण तोंडात घास जाताच त्याच तोंड कडू कडू झालं. तापाने त्याच्या तोंडाची चव गेली होती. पण नाकांत शिरलेल्या त्या वासाने त्याच्या चित्तवृत्ती जाग्या झाल्या होत्या. तोंडातला घास तसाच थुंकत त्याने खळाखळा चूळ भरली. अन्न तसेच लोटून त्याने स्वत:ला खाटल्यावर झोकून दिले. त्याचा अशक्तपणामुळे डोळा कधी लागला ते कळले नाही.

शेवंताच्या आवाजाने त्याला जाग आली. अन्न उघडे पडलेले बघून तिने तोंडाचा पट्टा सोडला होता. तिने त्याला नाही नाही ते बालून घेतले होते. पण आपलीच चूक झालेली असल्यामुळे तो मुकाट्याने ऐकून घेत होता. त्याला इथे रहाण्याचा खूप कंटाळा आला होता. पण नाईलाजाने त्याला येशाकडे रहावे लागत होते. गावाकडे रहायचे तर कोणाच्या तरी सोबतीशिवाय रहाणे शक्य नव्हते. राधा दोन वर्षापूर्वीच त्याला सोडून देवाघरी गेली होती. त्या आठवणीने तो व्याकुळ होई.

मुलाच्या संसारात आपली अडचण होते हे तो ओळखून होता. पण त्याचाही नाईलाज होता. महागाईने कहर केला होता. घरी थोडी फार शेती होती. पण वार्धक्यामुळे त्याला करणे जमत नव्हते. त्याने येताना शेती दुसऱ्याला लावावयास दिली होती. त्यातला अर्धा भात तो आणून देत असे. पण ह्या महागाईपुढे ते तरी किती पुरणार. गावाकडे खोपटं होत ते ही त्याने भाड्याने एका शाळामास्तरला दिले होते. त्याचे भाडे १० ते १५ रु. मिळत होते. सर्व बाजूंनी त्याची कोंडी झाली होती. आता मरेपर्यंत येशाच्या बिऱ्हाडातच त्याला रहावं लागणार होत.

येशा तसा स्वभावाने गरीब होता. त्याला आपल्या बापाची दया येई. इच्छा असूनही त्याच्या तुटपुंज्या पगारांत तो त्याला चागलं चुंगलं खाऊ घालू शकत नव्हता. तशी शेवंताही वाईट नव्हती. पण तीही परिस्थितीने गांजली होती.

पावसाची वावटळ संपली आणि दिवाळी दसऱ्याचे वेध लागले. वातावरणातही फरक जाणवू लागला. चाळीतल्या पुढे ओट्यावर सकाळच्या अकराच्या उन्हापर्यंत महादू गोधडी घेऊन बसू लागला. आता त्याचा थोडा वेळही बरा जाऊ लागला होता. येशाही कामावरून आला की त्याची आस्थेने चौकशी करी. मग पगाराच्या दिवशी बापाला आवडते म्हणून समोरच्या हॉटेलातून गरमागरम जिलेबी आणी. जिलेबी खाताना त्याच्या चेहऱ्यावर विसावलेला आनंद येशा काळजात साठवून घेई. पोर जिलेबी संपेपर्यंत महादूच्या मागे पुढे घुटमळत रहात. येणारी जाणारी माणसं महादूशी आपुलकीने बोलत. तेवढीच त्याच्या मनावरची मरगळ कमी होई.

एकदा येशाने त्याला गोड धक्का दिला. कुठेतरी उपनगरात जत्रा भरली होती. त्याने महादूला जत्रेला नेण्याचे ठरविले. जत्रेला जायचे आहे सांगताच महादू खूष झाला.

आज जत्रेला जायचं म्हणून त्याने ठेवणीतलं धोतर काढलं. राधेच्या माहेरचा आलेला फेटा त्याने काही काळ छातीशी धरला. जणु त्या फेट्यांत त्याला राधेचा स्पर्श जाणवत होता. मुलाच आणि सुनेच लक्ष नाही पाहून त्याने फेट्यावर अलगद ओठ टेकवले. आपली ही कृती कोणाच्या नजरेत येऊन नये म्हणून त्याने चपळाईने फेटा बांधला होता. त्याचा हा उत्साह पाहून येशा व शेवंता पण खूश झाली. पोरं तर आज्याचा हात धरून त्याच्या भवती फिरत राहिली. संगळ्यांचे आटपून दाराला कुलुप लावून सर्वजण जत्रेला निघाले. जत्रेचं ठिकाण तसं लांबच होतं. पण आज येशाने पाकीटाचं तोंड मोकळं सोडलं होत. कालच त्याला पैसे मिळाले होते. आपल्या बाला जास्तीत जास्त कसे खुश ठेवता येईल ह्याचा तो विचार करी. आईच्या माघारी त्याचे राहिलेले दिवस सुखाने जावे अशी त्याची इच्छा होती

*(पुढे पृष्ठ १५ वर)*



Marathe Pratishthan

# बेजिंग भेट

**- मोहन सदाशिव** (पृ.३६५) खार, मुंबई

***चीनला भारतातून फारसे प्रवासी जात नाहीत. आपले पूर्वविश्वस्त मोहनरावांनी मात्र पुतण्याच्या हाँगकाँग भेटीच्या निमंत्रणाचा फायदा घेऊन 'ड्रॅगन अेअर' च्या खास पॅकेज योजनेखाली सहकुटुंब, सहपरिवार चार दिवसांची बेजिंगवारी केली. त्यांच्या बेजिंगभेटीचा हा वृत्तान्त. - संपादक***



*टेम्पल ऑफ हेवन*

शंतनूने, माझ्या पुतण्याने मुंबईतील नोकरी सोडून हाँगकाँगमध्ये नोकरी पत्करली. तिथे स्थिरस्थावर झाल्यावर आम्हाला येण्याचा आग्रह केला. तेथे त्याच्याकडे राहून निवांतपणे हाँगकाँग पहाण्याची संधी होती. दुसरे आकर्षण तेथून चीनचा - किमानपक्षी बेजिंगचा दौरा करावयाचा हे होते.

२० एप्रिल २००१ ला आम्ही ६ जण म्हणजे मोठा भाऊ, वहिनी, बहीण-मेहुणे, मी व पत्नी रात्री ८.२० च्या Air India च्या विमानाने हाँगकाँगला गेलो. तेथे शनिवार ते मंगळवार असे ४ दिवस काढले. २५ एप्रिलला सकाळी ८च्या, कॅथे पॅसिफिकची चीनसाठीची उपकंपनी ड्रॅगन अेअरच्या, विमानाने बेजिंगला प्रयाण केले. प्रवास ३ तासाचा होता. इमिग्रेशन-कस्टम सर्वांतून सुटून हॉटेलवर पोचावयास १ वाजून गेला. २ वाजता स्थानिक भेटीसाठी बाहेर पडलो. येथे नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे हाँगकाँग विमानतळावर १०० US $ ला ७३५ (चिनी) युवान मिळाले तर बेजिंगच्या हॉटेलमध्ये ८०८ युवान मिळाले व हाँगकाँग श्रीमंत का ह्याचा थोडासा उलगडा झाला.

**पहिल्या दिवशी दुपारचा मुख्य कार्यक्रम टेंपल ऑफ हेवन ला भेट देण्याचा होता.** पण जाताना गाईड चार्लस (चार्ली) ने प्रथम तांब्यापासून नक्षीदार भांडी-वस्तू करण्याच्या सरकारी कारखान्यात भेटीस नेले. तेथे पोहोचल्याबरोबर खरेदीच्या डिसकाऊंटची कुपने मिळाली. सुहास्यवदनी चिनी मुलीने स्वागत करून कारखान्यात काम कसे चालते ते दाखवण्यास नेले. तांब्यावरील भांड्यांवरती कलात्मक चित्रे काढून त्यावर तांब्याचा कीस चिकटवतात. त्याला रंगवले जाते. भट्टीतून प्रखर आच देऊन ते भांडे बाहेर काढतात. असे २/३ वेळा करतात व सुंदर कलाकुसरीच्या वस्तू तयार होतात. यंत्रापेक्षा मानवी कलाकौशल्य खूप दिसून आले. कारखान्याला जोडून शो-रूम असते. त्यातील वस्तू घेण्याचा मोह होतो. पण खिशाला परवडणारे नसते. कारखान्यातील अवस्था आपल्या भारतासारखीच. स्वच्छता मात्र खूप. शो-रूमस् मुंबईच्या नेपियन सी रोडवरच्या प्रमाणे उत्कृष्ट.

कारखाना भेटीनंतर आम्ही टेंपल ऑफ हेवन बघावयास गेलो. हे मंदीर भव्य आहे. प्रचंड आवारात संगमरवरी जोत्यावर नुकत्याच पाहिलेल्या तांब्याच्या प्रचंड भांड्याप्रमाणे हे मंदीर आहे. इ.स. १४०६ ते १४२० मध्ये त्याची उभारणी अखंड वृक्षांच्या खांबांवर झाली आहे. मध्यभागी चार ऋतु दाखवणारे चार खांब आहेत. बाजूला १२ महिन्यांचे १२ खांब आहेत. त्याबाहेर खांब असून त्याबाहेर चुना, रेती, वाळू, सिमेंट, खिळे, खुंट्या काहीही न वापरता एकमेकांत घट्ट बसवलेल्या दगडांची गोल भिंत आहे.

चीनचा राजा ह्या मंदिरात येऊन धनधान्य चांगले पिकावे म्हणून प्रार्थना करायचा. प्रवेश द्वारात एका बाजूला सिंह व दुसऱ्या बाजूला छाव्याला पायाशी धरणारी सिंहीण असे पुतळे आहेत. मंदिरात देव नाही. पूजेसाठी उदबत्या (झाडूच्या काड्यांइतक्या मोठ्या पण आपल्या भारतातल्या इतक्या सुवासिक नाहीत) जाळतात. स्वर्गातल्या देवांना आवाहन केले जाते. देवळाच्या बाहेरच्या भिंतीवर निळ्या टाईल्स आहेत व तांब्याच्या प्रचंड भांड्याचा भास होतो. एका उभ्या फलकावर शांति, सुख, दीर्घायुष्य चिंतनपर लिहिले आहे. शेवटी बाहेर जाताना चिनी पद्धतीच्या चहापानाचा 'चकटफू' समारंभ झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता आम्ही **चांगलिंग येथील मिंग राजांची थडगी** पहावयास निघालो. अगोदर **वाटेवरच्या जेडच्या कारखान्याला** भेट दिली. जेड हिरवा (पाचू), पिवळसर व तांबडा असा तीन रंगात खाणीत मिळतो. लहान लहान तुकडे कारखान्यात आणतात तेव्हा त्यामध्ये सुद्धा अगदी लहानसा भाग जेड असतो. त्यामध्ये ही कठिण आणि नरम असे दोन प्रकार असतात. त्याप्रमाणे त्यावर शिल्पकाराची हत्यारे चालतात. खरे जेड व खोटे जेड घासून ओळखण्याच्या चाचण्या स्वागतिकेने आम्हाला दाखवल्या. वस्तू, बुद्धाची मूर्ति, मोठी भांडी, छोटी भांडी, अलंकार अनेक प्रकारचे. किंमती मात्र आवाक्याबाहेरच्या.

ह्या नंतर **आम्ही मिंग राजघराण्यातील राजे राण्यांची थडगी** पहावयास गेलो. चीनवर साम्राज्य स्थापणाऱ्या कुब्लाईखानाच्या युवान (यवन?) राजघराण्याच्या पाडाव करून स्थानिक मिंग राजघराणे इ.स. १३७९ मध्ये सत्तेवर आले. ह्या मिंग घराण्याच्या राज्यकाळात (इ.स. १३७९ ते इ.स. १६४४) म्हणजे २६५ वर्षात चीनची भरभराट झाली. साम्राज्याचा विस्तार झाला. (त्यात तिबेटही आले.) १९११ मध्ये चीनमध्ये राज्यक्रांती झाल्यावर सांस्कृतिक क्रांतीच्या कालात लाल शर्टधारी तरुणांनी ही थडगी तोडून फोडून टाकली. आतील प्रेतांचे अवशेष जाळून टाकले. आता राज्यकर्त्यांना त्याचे प्रवाशांच्या - (टूरिझमच्या) दृष्टीकोनातून महत्व पटले व त्यांची पूर्णपणे डागडुजी करण्यात

Marathi Pratishthan

आली. आता तिथे हजारो प्रवासी दररोज भेटी देतात. तेथून जवळ असलेल्या जेवणाच्या रेस्टॉरंटमध्ये दोन हॉलमध्ये एकावेळी ५००० प्रवासी मोठ्या गोल टेबलाभोवती खुर्च्यांवर बसून आरामात अन्न वाढून घेऊन जेवू शकतात.

तेथून जवळच **सॅक्रेड वे हा १ कि.मी. लांबीचा मोक्षाकडे नेणारा रस्ता**. दोन्ही बाजूला प्रथम पुरुष रक्षक नंतर हत्ती, घोडे, उंच असे प्राणी व नंतर पक्षांच्या पुतळ्यांची रांग आहे. दोन्ही बाजूने बाग आहे. ह्या रस्त्यावरून चालणे शाळातून सहलीला आलेल्या छोट्या सुंदर मुलांच्या-मुलींच्या चिवचिवाटामध्ये अत्यंत आल्हाददायक वाटले. त्यांना आपल्या साड्यांचे फार कुतूहल वाटले. त्यांनी आपल्या कॅमेऱ्यातून फोटो घेतले व आपलेही काढून दिले. ह्या भेटीनंतर आम्ही मोठ्या रेस्टॉरंटमध्ये गर्दी होण्यापूर्वी आरामात जेवणाचा आस्वाद घेतला. शाकाहारी म्हणजे उकडलेल्या भाज्या खाणारे असे चिनी लोकांचे समीकरण परत दिसून आले. भाज्यांवर उतारा म्हणून शेवटी सूप पाजण्यात आले.

*(यापुढील मजकूर पुढील अंकात...)*

## भारत चीन तुलना

| | | भारत | चीन |
|---|---|---|---|
| १) | आकारमान (चौ.कि.मी.) | ३३ लाख | ९६ लाख |
| २) | लोकसंख्या | १०१ कोटी | १२७ कोटी |
| ३) | शहरी लोक | २८ टक्के | ३३ टक्के |
| ४) | लोकसंख्या वाढीचा दर | १.९ टक्के | १ टक्का |
| ५) | आयुर्मर्यादा | ६२ वर्षे | ७१ वर्षे |
| ६) | प्रौढ साक्षरता | ५२ टक्के | ८३ टक्के |
| ७) | दरमाणशी निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न | ४५२ यू.एस.डॉलर्स | ७८३ यू.एस.डॉलर्स |
| ८) | निर्यात (यू.एस.डॉलर्स) | ४२ Billion | २४० Billion |
| ९) | आयात (यू. एस. डॉलर्स) | ४७ Billion | २२५ Billion |
| १०) | महागाई वाढीचा निर्देशांक | ३.५ टक्के | १.६ टक्के |

*(भूक : पृष्ठ १३ वरुन)*

जत्रेचा कार्यक्रम मजेत पार पडला. सर्वजण तृप्त मनांने घरी आले. एक दिवस चांगला गेला होता. जरा हिंडले फिरले म्हणून महादू खुश झाला. त्याला आपल्या पोराचे कौतुक वाटले. दिवसामागून दिवस जात होते. येशाही नोकरी सांभाळून इतर मार्गाने पैसा कमवत होता. त्याचे राहणीमान बदलले होते. शेवंताच्या अंगावरही दोन चार सोन्याचे डाग दिसत होते.

एकदम पालटलेली परिस्थिती पाहून महादू मात्र चक्रावला होता. येशाचे घरी उशीरा येणे सुरू झाले होते. त्याने एक दोनदा गोड बोलून त्याला पैशासंबंधी विचारले होते. पण त्यानेच उलट बापाला दरडावले होते. ''तुमाला काय करायच्या हाईत पंचायती. समोर येईल ते खावा आणि निमुट ऱ्हावा'' असे त्याने त्रासिकपणे त्याला उत्तर दिले होते. त्याच्या ह्या उत्तराने महादू आणखीन काळजी करत राही. ह्या शहाण्यासुरत्या मुलाला झाले तरी काय? आपल्या जीवाला जपणारा हा असा का वागायला लागला आहे. हा काही वाईट मार्गाने तर हा पैसा कमावत न्हाई ना. हा आणतो तरी कुठून? त्याच्या ह्या काळजीने त्याला रात्र रात्र झोप लागत नसे.

बरेच महिने शांततेत गेले. पण एक दिवस येशा आला तोच मुळी तराट होऊन. आल्या आल्या त्याने शेवंताला आणि पोरांना मारायला सुरवात केली. त्याचा हा अवतार बघून महादू तर घाबरूनच गेला. त्याने शेवंताच्या अंगावरचे दागिने हिसकावून घेतले. ती रडत भेकत त्याला शांत करू लागली. पण तो ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. हा तमाशा पहायला चाळीतील सर्व लोक जमा झाले होते. आजपर्यंत कधीच न घडलेलं असं विलक्षण घडत होतं. त्याच्याकडे आलेला अचानक पैसा, बदललेलं राहणीमान, सर्वांच्या नजरेत भरत होतं. पण उघड कोणीच बोलत नव्हतं. पैसा भरपूर मिळत असल्यामुळे जिभेचे चोचले पुरविले जात होते. आता त्याची सर्वांनाच सवय झाली होती. महादूचीही तब्येत चांगलं चुंगलं खायला मिळत असल्यामुळे थोडी सुधारली होती.

पण आज सगळ्याच गोष्टीला कलाटणी मिळाली होती. येशाच्या दारात कामाचे पैसे वसूल करण्यासाठी पठाण उभा राहिलेला पाहताच महादूचे पाय थरथर कापू लागले. तो पठाण पैसे घेतल्याशिवाय हलण्यास तयार नव्हता. येशाने पत्यात बराच पैसा सुरवातीला कमावला होता. त्याला पैशाची चटक लागली होती. जुगारात पैसे लावण्यासाठी त्याने पठाणाकडून चक्रवाढ व्याजाने पैसे घेतले होते. पण आज त्याच्या नशिबाने पलटी खाल्ली होती. आज तो जुगारात बराच पैसा हरून आला होता आणि त्यामुळे हा प्रसंग ओढवला होता.

त्या पठाणाची महादूने कशीबशी समजूत काढून त्याला दोन दिवसाच्या बोलीने पैसे देतो म्हणून वाटेला लावले होते. ह्या साऱ्या प्रकाराने घरातला आनंद, उत्साह मावळून गेला. त्यातच येशाची नोकरी सुटली. त्या पठाणाचे पैसे देण्यासाठी घरात होते नव्हते तेवढे त्याच्या स्वाधीन करावे लागले. पुन्हा परिस्थिती मूळ पदावर आली. त्यातच येशाचे पिणे वाढले. या चारपाच महिन्यात जिभेला झालेली सवय स्वस्थ बसू देईना. काहीतरी खमंग तिखट जाळ खावेसे वाटे. पण आणणार कोठून? शेवंता इकडले तिकडले आणून कशी तरी वेळ भागवीत असे. तेही अपुरे पडे. पोटांत भूकेची आग उठे. काहीतरी खाऊन आग शांत करावी असे महादूला वाटे.

त्यातच ह्या ओढवलेल्या परिस्थितीने महादूचे मन सैरभैर होई. तो भ्रमिष्टासारखा वागे. त्याला घरात बसणे नको वाटे. संध्याकाळ झाली की तो पाय नेतील तिकडे भटकत राही. कोणी काही तरी खायला द्यावे असे त्याला वाटे. त्या दिवशी असाच वैतागून तो रस्त्याने पाय ओढीत चालला होता. पोटात भुकेचा आगडोंब उसळला होता. भ्रमिष्ठासारखा तो तासन् तास चालत

*(पुढे पृष्ठ १६ वर)*



Marathe Pratishthan

*(भूक : मागील पानावरून)*

राही. त्या दिवशी तो चौपाटीवर आला होता. समोरच्या भेळीच्या गाडीवर त्याचे लक्ष जाताच क्षणांत झेप घेऊन त्याने हातात मावतील तेवढे कुरमुरे घेतले.

ह्या आकस्मिक हल्ल्याने भेळवाला गांगरून गेला. पण क्षणांत त्याला परिस्थितीची जाणीव झाली. महादू समोर गाडीवर ठेवलेल्या शेव, चिवडा, कुरमुऱ्याच्या राशीवर हात मारत होता. हातात येतील तेवढे घ्यायचे हा एकच विचार मनात जागृत झाला होता. पोटाची आग शांत व्हावी म्हणून त्याने हा पवित्रा घेतला होता. पण तो भय्या. त्याने त्याला जोराने ढकलून खाली रेतीत पाडले होते. पडता पडता त्याचा तोल जाऊन तो जवळच असलेल्या दगडावर आपटला होता. आधीच त्राण नसलेले त्याचे शरीर त्या माऱ्याने क्षणार्धात जमीनदोस्त झाले होते. सर्व जाणीवेच्या पलिकडे गेलेला त्याचा अचेतन देह अस्ताव्यस्त पडला होता. डोक्याला मार लागल्यामुळे रक्ताचा लालभडक ओघळ त्याच्या डोक्याखालून वहात होता व त्यात आजुबाजुला पडलेले कुरमुरे वाऱ्याने त्याच्याभोवती फेर धरून नाचत होते. ***

## या अंकात


१. **एक गाव एक गणपती** - उस्मानाबाद जिल्ह्यातील आदर्श योजना. पृ.१

२. **भजन न सपावे** (कविता) ................................ पृ.४
सौ. अर्चना पुरुषोत्तम मराठे

३. **समाजकार्य स्वयंसेवक** ................................ पृ.४
मनोहर दामोदर मराठे

४. **एका वर्षात दोन सुवर्णपदके पटकावणारी प्रियदर्शिनी मराठे**.. पृ.५

५. **अंधांसाठी स्पर्शलेखन-वाचन पद्धती** ................ पृ.६
डॉ. श्रीहरी मराठे

६. **आमचे दादा** ........................................ पृ.७
सौ. अनुराधा अरविंद मराठे

७. **अनुभवामृत - आमंत्रण** ............................ पृ.८
विनायक केशव मराठे

८. **नामांकन (Nomination)** ............................ पृ.९
उदय दत्तात्रय मराठे

९. **भूक** ............................................ पृ.१३
सौ. साधना सुधाकर मराठे

१०. **बेजिंग भेट** ...................................... पृ.१४
मोहन सदाशिव मराठे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३,४), **हसरे हितगुज** (पृ.७), **विवाह सहाय्य** (पृ.९ ते १२), **खुषीपत्रे** (पृ.६) आणि **Self Improvement** (पृ.१२) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan